दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## जम्मू-काश्मीरच्या नायब राज्यपालांच्या अधिकारात केली वाढ; केंद्र सरकारचा निर्णय

नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)- केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत जम्मू-काश्मीरच्या नायब राज्यपालांच्या अधिकारात वाढ केली आहे. त्यानुसार आता जम्मू-काश्मीरच्या नायब राज्यपालांना पोलीस आणि प्रशासकीय सेवेसंदर्भातील काही अधिकार प्राप्त झाले आहेत. महत्त्वाचे म्हणजे जम्मू-काश्मीरमध्ये लवकरच विधानसभेची निवडणूक होणार आहे. यापूर्वी, केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्याने विविध चर्चांनादेखील उधाण आलं आहे.

एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार, केंद्र सरकारने २०१९ च्या जम्मू-काश्मीर पुनर्रचना कायद्याच्या कलम ५५ मध्ये सुधारणा केली आहे. अधिसुचना जारी करत केंद्र सरकारने या संदर्भातील माहिती दिली आहे. या नवीन बदलानुसार, आता नायब राज्यपालांना पोलीस आणि लोकसेवे संदर्भातील काही अधिकार देण्यात आले आहेत. आता या विभागाशी संबंधित वित्त विभागाच्या परवानगीची आवश्यकता नसलेले प्रस्ताव मुख्य सचिवांच्या माध्यमातून थेट नायब राज्यपालांकडे सादर केली जाणार आहेत.

याशिवाय ॲडव्होकेट जनरल यांची नियुक्ती तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदलीसंदर्भात निर्णय घेण्याचे अधिकारही नायब राज्यपालांना देण्यात आले आहेत. वित्त विभागाची परवानगी नसलेल्या लाचलूचपत विभागाशी संबंधित प्रस्तावांवर निर्णय घेण्याचा अधिकारदेखील आता नायब राज्यपालांना देण्यात आला आहे.

(वर्ष ६३ वे अंक १८१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.१४ जुलै २०२४ (पाने ४) (किंमत २ रूपये)

# २० तारखेला पुन्हा उपोषण, त्याच दिवशी मोठी घोषणा

## मनोज जरांगेंच्या शांतता रॅलीचा छत्रपती संभाजीनगरमध्ये समारोप

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीचा आज छत्रपती संभाजीनगरमध्ये समारोप झाला. राज्य सरकारच्यावतीने मंत्री शंभूराज देसाई यांनी मनोज जरांगेंच्या उपोषणावेळी त्यांची भेट घेऊन त्यांच्याकडे २ महिन्यांचा अवधी मागितला होता. मात्र, मनोज जरांगे यांनी १ महिन्याची मुदत देत सरकारला १३ जुलैपर्यंत सगेसोयरे आणि मराठा आरक्षणावर निर्णय घेण्याचे आवाहन केले होते. जरांगे यांनी दिलेल्या मुदतीची वेळ आज संपत असून संभाजीनगरमधून मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला याची आठवण करुन दिली आहे. तसेच, सरकारने काही तो निर्णय घ्यावा, अन्यथा २० जुलैपासून आपण पुन्हा उपोषणलाा बसणार असल्याची घोषणाच त्यांनी केली. तसेच, आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाचे प्रतिनिधी द्यायचे की नाही, २८८ जागांवर निवडणूक लढवायची की नाही, याबाबतची घोषणाही त्याच दिवशी करणार असल्याचं जरांगे यांनी म्हटलं आहे.



मनोज जरांगे यांनी हिंगोलीतून आपल्या शांतता रॅलीला सुरुवात केली होती. त्यानंतर, मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यातून दौरा करत आज छत्रपती संभाजीनगर येथे त्यांनी आपल्या रॅलीचा सांगता केली. यावेळी, संभाजीनगरमधून पुन्हा एकदा आमरण उपोषणाची घोषणा केली आहे.

आज या लाखोंच्या संख्येने जमलेल्या मराठ्यांसमोर सरकारला जाहीर सांगतो, आजची रात्र सरकारच्या हातात आहे. फडणवीस साहेबांनी शिंदे साहेबांनी समजून घ्यावं, त्या छगन भुजबळच्या नादी लागू नका, उद्या दुपारी वाखरी येथे रिंगण सोहळ्याला मला तुकोबारायांच्या दर्शनाला जायचं आहे. मी उद्याच उद्या निर्णय घेणार होतो, पण उद्या दर्शनाला जात आहे. १८ आणि १९ तारीख दोनच दिवस माझ्या हातात आहेत, पुन्हा २० तारखेला मी आमरण उपोषण करणार आहे. मी स्थगित केलेलं उपोषण २० तारखेला पुन्हा सुरू करणार असून त्याचदिवशी उमेदवार द्यायचे का नाही हे ठरवणार, असल्याचे जरांगे यांनी म्हटलं. सरकार ला पुन्हा एकदा संधी द्यायची आहे, २० तारखेला तारीख जाहीर करू, त्या दिवशी २८८ पाडायचे की उभे करायचे हे ठरवू आणि मुंबईला कधी जायचे हेही ठरवू, असेही जरांगे यांनी जाहीर केले. नुसता मराठवाडा निघाला तर यांचे दंडुके काहीच काम करणार नाहीत, असे म्हणत राज्य सरकारवर निशाणा साधला.

मनोज जरांगे पुढे बोलताना म्हणाले की, आजची रात्र सरकारच्या हातात आहे. आम्ही सर्व मराठ्यांना विश्वासात घेतल्याशिवाय निर्णय घेणार नाही. आम्ही दिलेल्या ९ मागण्या पूर्ण करा. त्या गैबण्याच्या छगन भुजबळांच्या नादी लागू नका. त्याच्या नादी लागून तुमचे पक्ष बंद पडेल आणि सत्ताही जाईल, त्यामुळे त्याच्या नादी लागू नका, असं म्हणत मनोज जरांगे यांनी राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला आहे.

४० वर्ष लढणाऱ्याना सरकारने काहीच दिले नाही, पण १० महिन्यात काही ना काही मिळालंय ना?. दीड कोटी मराठे ओबीसीमध्ये आले आहेत. छगन भुजबळ तू पायावर चालतो मी डोक्यावर चालतो, असे म्हणत पुन्हा एकदा छगन भुजबळांवर जरांगेंनी हल्लाबोल (पान ४ वर)

## गाझामध्ये मोठा नरसंहार!; इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यात ७१ जणांचा मृत्यू

गाझा दि.१३ (वृत्तसंस्था)- गाझाच्या खान युनिस येथे इस्त्रायलने हल्ला केला असून यामध्ये किमान ७१ जणांचा मृत्यू झाला असून २५० हून अधिक नागरिक जखमी असल्याचे वृत्त आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. हमास संचलित गाझा सरकारने या हल्ल्याचे वर्णन मोठा नरसंहार असे केले असून मृतांमध्ये नागरी आपत्कालीन सेवा सदस्यांचा समावेश आहे.

या भीषण हल्ल्यात नागरी आपत्कालीन सेवाच्या सदस्यांच्या १०० हून अधिक लोक मारले गेले आहेत, असं हमाससंचालित गाझा सरकारी मिडिया कार्यालयाने एका निवेदनात म्हटलं आहे. तर, हमासचा लष्करी शाखा प्रमुख मोहम्मद देईफला इस्त्रायलने सैन्याने लक्ष्य केलं होतं, असंही इस्त्रायल सैन्याने म्हटलं आहे. एपीने दिलेल्या वृत्तानुसार, हमासचा आणखी एक महत्त्वाचा अधिकारी राफा सलामा यांनाही या हल्ल्यात लक्ष्य करण्यात आलं होतं.

दक्षिण इस्त्रायलमध्ये ७ ऑक्टोबर २०२३ मध्ये झालेल्या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार आणि इस्त्रायल-हमास युद्धाची सुरुवात करणारा मोहम्मद देईफ हा अनेक वर्षांपासून इस्त्रायलच्या मोस्ट वॉन्टेड यादी होता. त्यातच आज इस्त्रायलकडून हल्ला करण्यात आला आहे. गाझा आरोग्य मंत्रालयानुसार अनेक जखमी आणि मृतांना जवळच्या नासेर रुग्णालयात नेण्यात आले आहे. इस्त्रायली सैन्याने या हल्ल्याबद्दल जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे की, जिथे दोन वरीष्ठ हमास कमांडर लपले होते तिथेच हल्ला केला आहे. हवाई हल्ल्याचे ठिकाण झाडे, अनेक इमारती आणि शेड यांनी वेढलेले एक खुले क्षेत्र होते.'' हमासने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, इस्त्रायली लढाऊ विमाने, तोफखाना आणि ड्रोनने विस्थापित लोकांना लक्ष्य केले. या हल्ल्यात निर्दोष आणि असुरक्षित नागरीक मारले गेले आहेत. हा हल्ला पूर्वनियोजित हल्ला असल्याचंही म्हटलं जातंय. तसंच, या ठिकाणी हल्ला होणार असल्याची सूचना मे महिन्यापासून दिली जात होती. अखेर, इस्त्रायलने हल्ला केला. तसंच, इस्त्रायलला केला जात असलेला शस्त्रपुरवठा थांबवावा, असं आवाहन युके सरकारलही करण्यात आली आहे.

## सात राज्यातील १३ विधानसभा पोटनिवडणुकीत इंडिया आघाडीचा डंका, भाजपला तगडा झटका!

नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)- देशातील १३ विधानसभा जागांवर १० जुलै रोजी झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीला मोठा धक्का बसला असून इंडिया आघाडीला मोठा विजय मिळाला आहे. लोकसभा निवडणुकीत २३४ जागा जिंकणाऱ्या विरोधी भारत आघाडीने १३ जिल्ह्यांच्या पोटनिवडणुकीत बाजी मारली आहे. ज्या ७ राज्यांमध्ये १३ विधानसभा जागांसाठी पोटनिवडणूक झाली, त्यात इंडिया आघाडीमध्ये समाविष्ट असलेल्या पक्षांच्या उमेदवारांनी सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. ही सात राज्ये पश्चिम बंगाल, पंजाब, बिहार, तामिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेश आहेत. आमदारांच्या निधनामुळे किंवा आमदारांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या या १३ जागा आहेत.

या जागांमध्ये बिहारमधील रुपौली, रायगंज, राणाघाट दक्षिण, पश्चिम बंगालमधील बागडा आणि माणिकतला, तामिळनाडूमधील विक्रवंडी, मध्य प्रदेशातील अमरवाडा, उत्तराखंडमधील बद्रीनाथ आणि मंगलोर, पंजाबमधील जालंधर पश्चिम आणि हिमाचल प्रदेशातील देहरा, (पान ४ वर)

## मुंबईला जागतिक आर्थिक राजधानी बनवण्याचे लक्ष्य; पंतप्रधान मोदींची ग्वाही



मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. आता मुंबईला अर्थात महाराष्ट्राला जागतिक आर्थिक राजधानी बनवण्याचे आमचे लक्ष्य आहे, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. ते गोरेगावातील नेस्को प्रदर्शन केंद्रात बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते मुंबईतील विविध विकासकामांचे उद्धाटन व पायाभरणीचा शुभारंभ करण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आज मला महाराष्ट्र आणि मुंबईतील ३० हजार कोटींच्या प्रकल्पाचे उद्धघाटन आणि पायाभरणी करण्याची संधी मिळाली. या योजनेतून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. ७६ हजार कोटी रुपयांचे प्रोजेक्टमधून १० हजार पेक्षा जास्त लोकांना रोजगार मिळणार आहे. लहान मोठ्या गुंतवणूकदारांनी आमच्या सरकारच्या मोठ्या उत्साहात स्वागत केले. लोकांना माहिती आहे की, एनडीए सरकारच शाश्वती व स्थिरता देऊ शकते. तिसऱ्या टर्ममध्येच एनडीए सरकार तीन पट अधिक गतीने काम करेल, असा विश्वास लोकांना आहे आणि हे अगदी सातत्याने घडत आहे.

मोदी म्हणाले की, महाराष्ट्राकडे गौरवशाली इतिहास व सशक्त वर्तमान अन् समृद्ध भविष्याचे स्वप्न आहे. महाराष्ट्र असे राज्य आहे की, ज्याचा विकसीत भारतात मोठा वाटा आहे. महाराष्ट्रात उद्योग आहे. दुनियाची सर्वात मोठी आर्थिक केंद्र मुंबई (पान ४ वर)

## शरद पवारांनी जयंत पाटलांच्या पाठीत खंजीर खुपसला; सदाभाऊ खोत यांचा गंभीर आरोप

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- विधान परिषदेच्या निवडणुकीत शरद पवारांनी शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांच्या पाठीत खंजीर खुपसल्याचा आरोप रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष तथा आमदार सदाभाऊ खोत यांनी शनिवारी केला आहे. विधान परिषदेच्या ११ जागांसाठी शुक्रवारी निवडणूक झाली. त्यात सत्ताधारी महायुतीचे ९, तर विरोधी बाकावरील महाविकास आघाडीचे २ उमेदवार विजयी झाले. त्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुरस्कृत शेकापचे उमेदवार जयंत पाटील यांचा दारुण पराभव झाला. या पार्श्वभूमीवर सदाभाऊ खोत यांनी उपरोक्त टीका केली आहे. सदाभाऊ खोत म्हणाले की, शरद पवार महाविकास आघाडीचे सर्वेसर्वा आहेत. महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन करून मी कुणाचीही सत्ता आणू शकतो असा त्यांचा दावा आहे. राज्यात शिवसेना - भाजपचे युती सरकार आले तेव्हा त्यांनी फोडाफोडी केली. स्वतःकडे सत्ता येण्याची शक्यता असेल तर त्यांची काहीही करण्याची तयारी असते. शरद पवारांनी राज्यातील शेतकरी कामगार पक्ष संपवण्याचे काम केले. मुख्यमंत्री करताना उद्धव ठाकरे तुमचे ऐकतात. भाजपची साथ सोडतानाही ते तुमचे ऐकतात. मग जयंत पाटलांच्या साध्या उमेदवारीविषयी त्यांनी तुमचे का ऐकले नाही? हा शरद पवारांनीच टाकलेला डाव होता. त्यात जयंत पाटलांचा बळी गेला, असा आरोप सदाभाऊ खोत यांनी पवारांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करताना म्हटले आहे.

## क्रॉस वोटिंग करणाऱ्या आमदारांविरोधात सहा वर्षासाठीच्या निलंबनाची कारवाई करा; काँग्रेसच्या आमदाराची मागणी

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- काँग्रेस आमदारांनी विधान परिषदेच्या निवडणुकीत पक्षाच्या निर्देशांच्या विरोधात मतदान केलंय, त्यांना पक्षातून सहा वर्षासाठी निलंबित केलं पाहिजे, अशी मागणी काँग्रेस आमदार विकास ठाकरे यांनी केली आहे. काँग्रेस पक्षाच्या आमदारांनी कोणाला मतदान केलंय, कोणी पक्षाच्या निर्देशानुसार मतदान केले आहे आणि कोणी पक्षादेश धुडकावून क्रॉस वोटिंग केलंय, हे पक्षाच्या निरीक्षकांच्या सहज लक्षात आलं असेल. अशा क्रॉस वोटिंग करणाऱ्या आमदारांविरोधात सहा वर्षासाठीच्या निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी विकास ठाकरे यांनी केली आहे.

दरम्यान, नाना पटोले यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षाला गेल्या काही महिन्यात जे यश मिळालय, त्यामुळे पक्षातील काही नेते नाना पटोले विरोधात अशा क्रॉस वोटिंगला प्रोत्साहन देत आहेत का? या प्रश्नावर मात्र विकास ठाकरे यांनी कुठलेही स्पष्ट उत्तर दिलं नाही. मला त्या संदर्भात माहिती नाही, मात्र जे कोणी असं करत असेल त्यांच्या विरोधात कठोर कारवाई केली पाहिजे. असंही विकास ठाकरे म्हणाले.

विधानपरिषदेची निवडणूक चांगलीच चुरशीची झाली. यात महायुतीचे सर्वच्या सर्व ९ उमेदवार विजयी झाले. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे समर्थन असलेल्या शेकापचे जयंत पाटील यांचा मात्र या निवडणुकीत पराभव झाला. या निवडणुकीत काँग्रेसची जवळपास आठ मतं फुटल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, याच संभाव्य फुटीर आमदारांना ओळखण्यासाठी काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी एक सापळा रचला होता, या सापळ्यात अडकलेल्या फुटीर आमदारांवर आता कारवाई होणार असल्याची चर्चा आहे.

''मतं फुटल्याचं सांगितलं जात आहे. याआधीच्या विधानपरिषदेच्या निवडणुकीत चंद्रकांत हंडोरे उभे होते, तेव्हाही असाच प्रकार झाला होता. तेव्हाच्या निवडणुकीतील बदमाश लोक ओळखले गेले नव्हते. मात्र यावेळी आम्ही ट्रॅप लावला होता. या सापळ्यात हे बदमाश आमदार सापडले आहेत. आम्ही याबाबत वरिष्ठांना कळवलं आहे. पार्टीविरोधी काम करणाऱ्या, पार्टीशी बेईमानी करणाऱ्या, गद्दारी करणाऱ्या आमदरांना बाहेरचा रस्ता दाखवला जाईल,'' असे स्पष्टपणे नाना पटोले म्हणाले.

## मुंबईला जागतिक आर्थिक केंद्र करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वप्न फसवे, नाना पटोले यांची टीका

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- मुंबईतील २९ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्धाटन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबईला जागतिक आर्थिक केंद्र करण्याचे स्वप्न असल्याचे सांगितले ते पटण्यासारखे नाही. मागील १० वर्षात भाजपा सरकारने मुंबई व महाराष्ट्राचे सर्वच बाबतीत खच्चीकरण केले आहे. मुंबईतील जागतिक वित्तीय केंद्रासह अनेक महत्वाच्या कंपन्यांची कार्यालये, प्रकल्प गुजरात व इतर राज्यात पळवले. महाराष्ट्रातून सर्वात जास्त कर दिल्लीला दिला जातो असे असतानाही राज्याला परतावा देताना भेदभाव केला जातो हे उघड असताना मुंबईला जागतिक आर्थिक केंद्र करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आश्वासन फसवे वाटत असून विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केलेली फेकाफेकी आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या दाव्यांचा समाचार घेताना नाना पटोले पुढे म्हणाले की, मोदींनी मुंबई व महाराष्ट्राच्या विकासाचे मोठ मोठे दावे केले असले तरी वस्तुस्थिती तशी नाही. महाराष्ट्र केंद्र सरकारला सर्वात जास्त कर संकलन करुन देते मात्र राज्याला निधी देताना मात्र हात आखडता घेतला जातो. मागील महिन्यातच जाहीर (पान ४ वर)

## वास्तववादी अर्थसंकल्प तयार करा, कॅगकडून राज्य सरकारवर ताशेरे; कर्जाचा बोजा आठ लाख कोटींवर!

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- महसुली जमा आणि खर्च यांच्यातील वाढत चाललेल्या तफावतीमुळे भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षकांनी (कॅग) राज्य सरकारवर ताशेरे ओढले आहेत. महसुली जमा आणि खर्च यांच्यातील वाढत चाललेल्या तफावतीमुळे तिजोरीवर भार वाढत असल्याचे निरीक्षण सुद्धा नोंदवलं आहे. २०२२-२३ या वर्षाच्या महाराष्ट्र राज्य वित्त लेखापरीक्षण अहवालाने राज्य सरकारला वास्तववादी अर्थसंकल्प तयार करण्याची शिफारस केली आहे. या अहवालातून वित्त, अर्थसंकल्पीय व्यवस्थापन आणि खात्यांची गुणवत्ता, आर्थिक अहवाल पद्धती आणि राज्य वित्ताशी संबंधित इतर बाबींची पाहणी केली जाते.

''राज्य सरकारने विभागांच्या गरजा आणि वाटप केलेल्या संसाधनांचा वापर करण्याची क्षमता लक्षात घेऊन वास्तववादी अर्थसंकल्प तयार करावा,'' अशी अहवालात सूचना करण्यात आली आहे.

पुरवणी मागण्या, विनियोग तसेच पुनर्विनियोग पुरेशा औचित्याशिवाय प्राप्त झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात अखर्चित राहिल्याबद्दलही अहवालात चिंता व्यक्त करण्यात आली आहे. ''राज्य सरकारने राबविलेल्या अर्थसंकल्पाची कसरत अधिक वास्तववादी असणे आवश्यक आहे कारण एकूण तरतुदीपैकी १८.१९ टक्के निधी वापरात नाही. वर्षभरात झालेला एकूण खर्च मूळ अर्थसंकल्पापेक्षा सहा टक्के कमी होता आणि पुरवणी अर्थसंकल्प मूळ अर्थसंकल्पाच्या १५ टक्के होता,'' असे अहवालात नमूद केले आहे.

या अहवालात राज्याला त्यांच्या गुंतवणुकीबाबतही सल्ला देण्यात आला आहे. ''सरकार गुंतवणुकीतील पैशाचे चांगले मूल्य सुनिश्चित करण्यासाठी पावले उचलू शकते. अन्यथा, उच्च खर्चावर कर्ज घेतलेले निधी कमी आर्थिक परतावा असलेल्या प्रकल्पांमध्ये गुंतवले जातील,'' असे त्यात म्हटले आहे. त्यात पुढे म्हटले आहे की, खर्चाचे तर्कसंगतीकरण करण्यासाठी, पुढील स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी, महसूलाचा आधार वाढवण्यासाठी आणि महसूल उत्पन्न करणाऱ्या मालमत्तेमध्ये गुंतवणूक करण्यासाठी उपायात्मक उपायांचा अवलंब करून दीर्घकालीन वित्तीय स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकारने कर्ज पातळीचे निरीक्षण आणि व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

दरम्यान, राज्यावरील कर्जाचा बोजा आठ लाख कोटींवर गेला आहे. कर्जाचे हे प्रमाण राजकोषीय स्थूल उत्पन्नाच्या १८.७३ टक्के आहे. राजकोषीय कायद्यातील तरतुदीनुसार हे प्रमाण १८.१४ टक्के अपेक्षित आहे. हे प्रमाण वाढलं आहे. यापूर्वी घेतलेला कर्ज आता फेडावे लागणार आहे. यातूनच सरकारच्या तिजोरीवर अधिक बोजा वाढणार आहे याबद्दल 'कॅग'ने सरकारला सावधतेचा इशारा दिला आहे.

दरम्यान, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी कॅग अहवालाचा संदर्भ देत राज्य सरकारवर हल्लाबोल केला आहे. ते म्हणाले की, माझ्या अर्थसंकल्पीय चर्चेतील भाषणात मी राज्यात मालमत्ता निर्मिती होत नसल्याबद्दल राज्याचे लक्ष वेधले होते. नेमकी तीच बाब देशातील सर्वोच्च घटनात्मक यंत्रणा (पान ४ वर)

## पूजा खेडकर दोषी आढळल्यास कारवाई करावी, राष्ट्रीय दृष्टीहीन संघाची मागणी

पुणे दि.१३ (प्रतिनिधी)- राज्यासह देशभरात चर्चेत आलेली ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकर हिच्या दिव्यांग प्रमाणपत्रबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. तिने खोटं प्रमाणपत्र सादर केलं असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान वादग्रस्त ट्रेनी आयएएस अधिकारी पुजा खेडकर दोषी आढळल्यास तिच्यावर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रीय दृष्टीहीन संघाकडून करण्यात आली आहे. पुजा खेडकर हिने जर अंध असल्याचं खोटं प्रमाणपत्र सादर केलं असेल तर तिने एका खऱ्या अंध व्यक्तीवर अन्याय केला आहे असं या संघटनेचे सदस्य असलेल्या अंध व्यक्तीने म्हटलं आहे.

त्याचबरोबर एखाद्या व्यक्तीला किमान चाळीस टक्के दृष्टीदोष असेल तरच त्या व्यक्तीला दिव्यंगत्वाचे प्रमाणपत्र मिळते आणि अशी व्यक्ती कार चालवणं तर दूरच लिहू-वाचू देखील शकत नाही असं या अंध व्यक्तींच म्हणणं आहे. त्यामुळे पुजा खेडकरने प्रमाणात कसं मिळवलं असा प्रश्न या अंध व्यक्तीने उपस्थित केला आहे.

वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर हिला अहमदनगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयातून दिव्यांग प्रमाणपत्र देण्यात आल्याची माहिती आहे. अभिलेख तपासणीमध्ये ही बाब समोर आली असून जिल्हा शासकीय रुग्णालयातून २०१८ मध्ये नेत्र दिव्यांग प्रमाणपत्र आणि २०२० मध्ये मानसिक आजारी असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.पूजा खेडकरला डोळे आणि मानसिक आजाराचे एकत्रित प्रमाणपत्र २०२१ मध्ये दिल्याची (पान ४ वर)

# चला झाडे लावू या...

**झाडे** ही आपली जीवन संजीवनी आहे. सजीवांना जगण्यासाठी ऑक्सिजन वायू देऊन त्यांनी सोडलेला कार्बन डायऑक्साईड शोषून घेतात. त्यासाठी झाडांची संख्या वाढली पाहिजे. झाडे ही पर्यावरण स्वच्छ ठेवण्यास महत्त्वाची भूमिका बजावीत असतात. त्यामुळे आपल्याला शुद्ध हवा मिळते. त्यासाठी प्रत्येक वर्षी पावसाळ्यात झाडे लावलीच पाहिजेत.

कोकणामध्ये विकासाच्या नावाखाली जंगल तोड होताना दिसत आहे, तर काही ठिकाणी डोंगर सपाट करून गगनचुंबी इमारती उभ्या होत आहेत. अशावेळी कोकणचे निसर्गरम्य सौंदर्य टिकून ठेवण्यासाठी दरवर्षी नवीन झाडे लावू या. कोकणाला जन्मतः निसर्गाचे विनामूल्य वरदान लाभले आहे. त्याचे संगोपन करणे प्रत्येक कोकणवासीयांचे कर्तव्य आहे. केवळ पर्यावरण दिवशी 'झाडे लावा देश वाचवा' किंवा 'झाडे लावा झाडे जगवा' अशी घोषणाबाजी करत बसण्यापेक्षा आता सर्वांची जबाबदारी आहे ती म्हणजे आपल्या परिसरात झाडे लावण्याची.

उन्हाळ्यात जेव्हा उष्णतेत वाढ होते तेव्हा झाडांची प्रत्येकाला आठवण होत असते. मात्र पाऊस पडायला लागला की, सर्वजण आठवणी विसरून जातात. तेव्हा नैसर्गिक संतुलन राखण्यासाठी प्रत्येकांने आपल्या परिसरात झाडे लावावीत. ती सुद्धा नर्सरीमधील न घेता मोफत उगवणारी. जंगलामध्ये जी झाडे आहेत ती लावलेली नाहीत, तर उगवलेली झाडे आहेत. तिचे कोणत्याही प्रकारे संगोपन केलेले नसते. निसर्गानेच दिलेली विनामूल्य ही देणगी आहे. उलट विकासाच्या नावाखाली सध्या जंगलतोड होताना दिसत आहे. अशावेळी झाडे लावायला हवीत. आता मोफत कोणती झाडे उगवतात, याविषयी अधिक माहिती घेऊ.

बऱ्याचवेळा आपण आंबे, फणस, जांभळे इत्यादी खाऊन त्याच्या बिया आपल्या घराच्या शेजारी असलेल्या उकिरड्यावर टाकतो. पाऊस लागल्यावर त्याला कोंब येतात. त्यानंतर ती झाडे वाढू लागतात. ती झाडे मुळासकट कुपळून आपल्या परिसरात लावावीत. यासाठी कोणत्याही प्रकारे झाडांची लागवड करण्याची किंवा विकत घेण्याची गरज नसते. फक्त ज्याठिकाणी पडीत जागा असेल, अथवा आपल्या घराच्या परिसरात जी झाडे वाढलेली असतील ती झाडे कुपळून मोकळ्या जागेत, खड्डे खणून त्यात झाडे लावावीत. यात दुहेरी फायदा होऊ शकतो. फळे पण मिळतात आणि पर्यावरण संतुलनही राखता येते.

मागील दहा ते पंधरा वर्षांपूर्वीचा आढावा घेतल्यास राज्यात उन्हाळात सुद्धा अवकाळी पावसाने अधूनमधून हजेरी लावली होती. त्यात राज्यातील नागरिकांना उष्माघाताने आपल्या जीवाला मुकावे लागले होते. काही ठिकाणी सेवकांचा उष्माघाताने मृत्यू झाला. याची राज्यातील नागरिकांना कल्पना आहे. त्यानंतर जरी रुपये पाच लाखांची शासकीय मदत जाहीर झाली, तरी घरातील व्यक्तीचे यामध्ये हकनाक निधन झाले. याला जबाबदार कोण? नंतर कदाचित हे पण नैसगिक संकट म्हणून जाहीर केले जाईल. यात निरपराध नागरिकांना आपल्या जीवाला मुकावे लागले हे मात्र निश्चित.

आता पावसाळा.. तू चालू असून पावसाला सुरुवात झाली आहे. ती सुद्धा संततधार. उन्हाळ्यातील परिस्थितीचा विचार करून राज्यातील सुजाण नागरिकांनी न विसरता आपल्या परिसरात झाडे लावावीत. तेव्हा प्रत्येकांने उन्हाळ्यातील उकाड्याला आळा घालण्यासाठी झाडांची लागवड करणे आवश्यक आहे. महत्त्वाची बाब म्हणजे प्रत्येक ग्रामपंचायतीने सुद्धा उन्हाळ्यातील ग्रामसभा पाण्याच्या प्रश्नावर वादळी झाल्याने आपल्या ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत येणाऱ्या प्रभागामध्ये ज्याठिकाणी मोकळी जागा असेल किंवा पडीत मळे असतील, अशा सपाट जागेचे सर्वे करून त्याठिकाणी कोणत्या झाडांची लागवड करू शकतो, तसेच किती झाडे लावू शकतात याचा आराखडा तयार करून तशाप्रकारे जवळ असलेल्या नर्सरीमध्ये जाऊन योग्य ती प्रक्रिया करून झाडे लावण्यात यावीत, असे दरवर्षी करणे गरजेचे आहे. अशाप्रकारे झाडे लावून रोजगार निर्मिती सुद्धा करू शकतात. मात्र पहिल्या सुरुवातीला थोडी मेहनत घ्यावी लागेल. यामध्ये फणस, काजू, आंबे यांची लागवड करू शकतो. किमान तीन वर्षांनंतर उत्पन्न सुरू होते. त्याप्रमाणे झाडांची काळजी घेणे गरजेचे असते. त्यानंतर सागाची झाडे सुद्धा लावून बऱ्यापैकी उत्पन्न मिळू शकते. त्याची पण लागवड करायला हरकत नाही. त्यासाठी मेहनत महत्त्वाची असते.

ज्या विभागात जास्त झाडे असतात त्याठिकाणी जास्त पाऊस पडतो. झाडांमुळे त्या विभागातील वातावरण काहीसे उष्ण व दमट असते. तेव्हा दुष्काळी भाग आपल्याला खऱ्या अर्थाने समृद्ध करण्यासाठी झाडे लावणे गरजेचे आहे. मागील वर्षातील उष्माघाताचा विचार करता झाडांचे महत्त्व सर्वांनी समजून घेतले पाहिजे. त्यासाठी पावसाळ्यात नवीन झाडांची लागवड करू या. जीवनामध्ये प्रत्येकाला झाडांची गरज असते. मात्र विकासाच्या नावाखाली झाडे तोडली जातात. त्या प्रमाणात झाडे लावायला हवीत. पाहा ना, मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम चालू असल्याने अनेक झाडांची कत्तल करण्यात आली. मात्र आता काही ठिकाणी काम झाले असून रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडे लावणे आवश्यक आहे. तेव्हा शासनाने चौपदरीकरण केलेल्या रस्त्याच्या बाजूने झाडे लावायला हवीत. तसेच मे महिन्यामध्ये वणवा लागल्याने बऱ्याच प्रमाणात झाडांचे नुकसान होते. म्हणजे एकप्रकारे जंगल नष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो. आपणा सर्वांना माहिती आहे की, निसर्गचक्रात शुद्ध हवा झाडांमुळे मिळत असते. तेव्हा शासन स्तरावर तसेच वृक्ष मित्रांनी झाडांचे संगोपन केले पाहिजे. केवळ झाडांवर नंबर टाकून चालणार नाही, तर झाडांचे संगोपन करून दरवर्षी पावसाळ्यात नवीन झाडे लावायला हवीत.

# भाववाढ शेतकऱ्यांची आणि भांडवलदारांची?

**कृषिप्रधान** देशात शेतकऱ्याच्या कांदा भाजीपाला भाववाढ झाली. की देशातील उच्च वर्णीय अर्थतज्ञ, साहित्यिक, संपादक आणि मनुवादी विचारांच्या संघटनाचे नेतृत्व करणारे नेते पेटून उठतात. सर्व वृतपत्रात त्यांच्या बातम्या लेख प्रसिद्ध होतात.आणि चॅनल मीडियावर त्यांच्या शेतकाऱ्याच्या भाववाढी बाबत चोवीस तास चर्चा घडवून आणल्या जातात. पण मोबाइल कंपन्यानी रिचार्ज डायरेक शंभर रुपये वाढविले त्या विरोधात राज्यात देशात कुठे ही आवाज नाही,की निषेध नाही.वृतपत्रात त्यांच्या निषेधाच्या बातम्या लेख प्रासिद्ध झाले नाहीत.आणि चॅनल मीडियावर भांडवलदारांच्या मोबाइल कंपन्याच्या रिचार्ज भाववाढीवर साधी बातमी नाही. या देशात सर्वच शेतकरी, कामगार, मजूर हिंदू आहेत आणि मोबाइल वापरणारे सर्वच ग्राहक हिंदू आहेत. शेतकऱ्यांच्या भाववाढीवर बोलणारे,लिहणारे मोबाइल कंपनीच्या रिचार्ज भाववाढी बाबत का लिहत नाही? ही भारतातील आणि हिंदुस्थानतील विषमता बहुसंख्य हिंदूंना का दिसत नाही.

भारतीय कामगारंची आणि शेतकऱ्याची फार वाईट परिस्थिती आहे.आई जेवण घालत नाही आणि बाप भीक मागु देत नाही. मायबाप सरकारच काय करावे याचा मोठ्ठा पेच पडलाय कामगारांना व शेतकऱ्यांना! काँग्रेस हे भांडवदाराचे सरकार आहे. ते गोरगरीब शेतकऱ्याला मजुरांना सुखाने जगू देत नाही. म्हणूनच यांना सत्तेतुन घालविल्या शिवाय शेतकऱ्यांना चांगले दिवस येणार नाही.हे बेबीच्या देठा पासुन ओरडुन सांगणारे राज्यातील देवेन्द्र फडणवीस साहेब आणि देशभर छप्पन इंच छाती फुगवुन सांगणारे नरेंद्र मोदी साहेब यांना आता काय कठीण वाटत आहे. ते देशातील तमाम कामगार कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांना समजण्या पलीकडे झाले आहे. तेव्हा काँग्रेस ही काही भाजप शिवसेने सारखी ज्वलंत हिंदुत्व वादी नव्हती. सर्वधर्म समभाव मानणारी होती. म्हणून शेतकऱ्याची कृषी उत्पन्न बाजार समितीत हिंदुत्ववादी शेतकऱ्यांची प्रचंड लुटमारी होत होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या सोसायटी कर्जाचा डोंगर कमी होण्या ऐवजी वाढत होता. तेव्हा दुष्काळ जाहीर करण्यासाठी गर्वसे कहो म्हणणारे तालुका, जिल्हा सिंह गर्जना करून हालवून ठेवत होते. आता त्यांना मंदिराबाहेर हिंदुत्ववादी शेतकरी, कर्जबाजारी शेतकरी दिसत नाही. त्यामुळे दुष्काळ जाहीर करायचा प्रश्नच उद्धभवत नाही. तेव्हा विहिरींना पाणी नव्हते. आता पाणीच पाणी आहे विहीरीला, तेव्हा लाईट नव्हती आणि लाईटबील मात्र वेळेवर येत होतो. आता भरपूर लाईट आहे. त्यामुळे लाईटबिल वेळच्या वेळेला येत नाही. तेव्हा काँग्रेस सह सर्वच पक्षाच्या नेत्यांचे डोळे फुटले होत. कान बहिरे झाले होते. त्यांची वाचा गेली होती. कारण त्यांनी ज्वलंत हिंदुत्ववादी कामगारांचे व शेतकऱ्यांचे कोणतेच दुःख दिसत नव्हते. तेव्हा राज्य व केंद्र साकारलं पाझर फुटत नव्हता. आताचे राज्य आणि केंद्र सरकार किती दयाळू आहे पहा. किती गरीब कष्टकरी उधोगपतीनां कर्ज माफ केले. विजय मल्ल्या नऊ हजार करोड रुपये कर्ज बुडवून परदेशात गेला. काही केले नाही सरकार आणखी किती संस्कारीत माणस सत्ताधारी पाहिजे. शेतकऱ्यांना कर्ज देतांना सातबारा आणि ओळखीचे दोन जामीनदार लागतात. तेव्हा बँक अधिकारी कर्ज पास करतात. मग विजय मल्ल्याला कर्ज देतांना कोणते कागद पत्र आणि जामीनदार घेतले? ते ते सरकार आणि हे सरकार का नाही जाहीर करत? हिंदुत्ववादी शेतकऱ्यांच्या थकबाकीची माहिती जामीनदारांच्या नांवासह वृत्तपत्रात जाहिरात देऊन जनतेला सांगितल्या जाते. मग या बँक अधिकाऱ्यांच्या गुणवंता, कर्तबदारीचे जाहीरपणे मूल्यमाफन का होत नाही. शेतकऱ्यांना कर्ज देणाऱ्या अधिकाऱ्यांना वेगळा न्याय आणि गरीब उद्योगपतीनां कर्ज देणाऱ्या अधिकाऱ्यांना वेगळा न्याय का?. कोणाची जात धर्म आडवा येतो?तिथे ज्वलंत हिंदुत्व म्हणजे राष्ट्रीय लागू होत नाही काय?.

सरकारकडे पैसा नाही शेतकऱ्यांच्या कर्ज माफीला. पण भारतातील ४०० रेल्वे स्टेशन वर फ्री वाय फाय सेवा देण्यासाठी सरकारने गूगल सोबत साडेचार लाख कोटी रुपयांचा करार केला होता. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करायला ७६ हजार कोटी नाहीत आणि वाय फाय साठी साडेचार लाख कोटी होते.माणसाला जगायला 'भाकरी ' पाहिजे कि वाय फाय? देशातील सर्व सरकारी नोकऱ्या या नागरिकांची सेवा करण्यासाठी असतात. त्या उत्पादन करणाऱ्या कंपन्या, कारखाने नाहीत. तरी त्यांना दरवर्षी महागाई भत्ता आणि इतर सवलती मिळतात. त्यांच्या कर्मचाऱ्यां करीता सातवा वेतन आयोग लागू होते. मग शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित भाव का नाही?. शेतकऱ्यांच्या पिकाला महागाईची झळ पोचत नाही काय? शेतकऱ्यांना बी-बियाने औषध, शेतमजूर यांच्या करीता पैसा कुठून येणार? कृषिविभागतील सर्व दुकानदार, व्यापारी, अडते, दलाल यांना सर्व महागाईची झळ लागते. कृषीउत्पन्न बाजार समितीच्या माथाडी कामगारांन कडून माथाडी बोर्ड चाळीस, ४१ टक्के लेव्ही कापुन घेते. त्यांचा त्याकामगारांना कोणताही फायदा मिळत नाही. त्यावर सर्व कर्मचारी, पुढारी कायम स्वरूपी मलिदा खातात. शेतकऱ्यांना जात,धर्म,प्रांत नसतो. पण राजकीय पक्षांना त्यांच्या कार्यकर्ते,नेते यांना जात, धर्म, प्रांत असते. त्यावरच ते शेतकऱ्यांचे मतदान मिळवितात. तेव्हा त्यांना लाज कशी वाटत नाही. शेतकऱ्यांच्या मतदानावर निवडून यायला. ज्यांच्या मतदानावर निवडून येतात आणि त्यांनाच सवलती देतांना हात मोडतात. पण कंपनी, कारखाने, बिल्डर्स यांचा टॅक्स माफ करतांना मेंदू आणि हात बरोबर काम करतात.

विरोधी पक्षात असतांना सत्तेच्या खुर्चीसाठी ओरडून सांगत होता. कामगार, कर्मचारी शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे. मग आता काय झालं तुमच्या डोक्यातील मेंदूला. आता त्यांची निर्णय क्षमता कोमात गेली काय? हिंदुत्व, मराठी माणस, धार्मिक भावनिक साद घालून कामगार, कर्मचारी शेतकरी नेला स्वर्गात आणि सत्ता मिळविली. आघाडीचे सरकार एकमेकांना सारखे शिव्या शाप देत होते पण सत्ता सोडत नव्हते. ते कोणते ही हिंदुत्वाचे संस्कार नसलेले बोके होते. युतीच्या सरकारात तर पिवर हिंदुत्वाचे संस्कार झाले नेते आहेत. हे त्यांच्या पेक्षा जास्त भांडतात. पण कामगार, कर्मचारी शेतकऱ्यांना मराठी माणसांना न्याय देण्यासाठी सत्तेतुन बाहेर पडत नाही. म्हणून आता शेतकऱ्यांना स्वर्गात जाण्याकरिता आत्महत्याच करण्याची पाळी आणली राज्यकर्त्यांनी.

शेतकऱ्यांची शेतजमीन विकास करण्यासाठी घेता आणि उधोगपतीनां कवडी मोलाचे देता.त्यात तुम्ही मरे पर्यंत कमिशन खाणार आणि चार पिड्या बसुन खातीन एवढी संपत्ती गोळा करणार. शेतकऱ्यांची मुलं शेती गेल्यावर शहरात येऊन हाऊस पिकिंग किंवा वाचमन म्हणून कायम असंघटीत कामगार म्हणून काम करणार. या देशात देव देविका जागृत असत्या तर यांना त्यांनी कठोर शिक्षा केली असती. पण तेच भटा ब्राम्हणाच्या बौद्धिक कौशल्यामुळे दररोज बाजारात पांच रुपये किंमतीत विकल्या जात आहेत. हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व म्हणणारे कामगार, कर्मचारी शेतकऱ्यांना कोणत्याच गिनतीत घेत नाही. उच्चवर्णीय वर्गीय बँक अधिकारी शेतकऱ्यांच्या कर्ज माफीला जाहीर विरोध करण्याची हिंमत करतातआणि हजारो कोटी रुपयाचे कर्ज बुडविणाऱ्या उच्च वर्णीय, वर्गीय उधोगपतीचे कर्ज माफीची जाहीर समर्थन करतात. म्हणजे कामगार, कर्मचारी शेतकरी मेला तरी चालेल उधोगपती जगला पाहिजे ही भूमिका घेतात.

कामगार, कर्मचारी शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारे प्रामाणिक असते तर यांनी या अधिकाऱ्यांचे जगणे कठीण केले असते. आता कुठे आहेत.ते तोंडाला काळे फासणारे कट्टर हिंदुत्ववादी. कुठे आहे त्यांचा मराठी धर्म, पैसा सर्व श्रेष्ठ झाला आहे. धर्माचे संस्कार, नीतिमत्ता कुठेच शिल्लक राहिली नाही. आघाडी सरकार व युती सरकार नालायक होते. म्हणजे सरकार कोणाचे ही असो. कामगार आणि शेतकरी हा भरडला जाणार असेल तर त्यांनी काय केले पाहिजे. जिसकी संख्या भारी उतनी उसकी भागेदारी म्हणजे शेतकरी आणि हितकरी, बहुजन हिताय बहुजन सुखाय असलाच पाहिजे.करीता शेतकऱ्यांनी महात्मा जोतीराव फुले यांचा आसुड हाती घेऊन कामगार, शेतकरी मेला तरी चालेल उधोगपती पुजारी जगला पाहिजे असे धोरण घेणाऱ्या ठेवणाऱ्यांना फोडून काढलेच पाहिजे. सर्व शेतकऱ्यांच्या वतीने सर्वच कामगार शेतकऱ्यांना प्रार्थना करतो. भटा ब्राम्हणांच्या सांगण्या वरून देवाला प्रार्थना करणे सोडा!. जिवंत माणसाला कामगार शेतकऱ्यांना हात जोडून प्रार्थना करा. जात, धर्म सोडा. शेतीवर जगणाऱ्या सर्वच कामगार, कर्मचारी अधिकारी, शेतकरी माणसांना जोडा.

**- सागर रामभाऊ तायडे**
**भांडुप, मुंबई ९९२०४०३८५९.**

# पत्रकारांच्या महामंडळाला मुख्यमंत्र्याची मान्यता
# 'व्हॉईस ऑफ मीडिया 'च्या लढ्याला दोन वर्षांनी यश

## महत्त्वपूर्ण विषयांनाही दिली मुख्यमंत्र्यांनी दिली मंजुरी

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - गेल्या दोन वर्षांपासून पत्रकारांचे स्वतंत्र महामंडळ असावे, यासाठी 'व्हॉईस ऑफ मीडिया' या पत्रकारांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेने महाराष्ट्रामध्ये लढा दिला होता. अखेर 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या या लढ्याला यश आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांच्या महामंडळाला मान्यता दिली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या पदाधिकाऱ्यांना बोलवून विधान भवनामध्ये एका बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीमध्ये महामंडळासाठी शासकीय नियमावली तयार करून महामंडळाचे कामकाज सुरू केले जाणार आहे, असे ठरले. या महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक पत्रकाराला लाभ घेता येणार आहे.

तेरा वेळा आंदोलन, सहा वेळा उपोषण केल्यानंतर अखेर 'व्हॉईस ऑफ मीडिया' ने महाराष्ट्रातल्या पत्रकारांच्या पदरामध्ये महामंडळासारखा खूप मोठा विषय पाडून घेतला. मागच्या आठवड्यात राज्यातल्या तहसील, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्यासमोरही आंदोलन केले होते. आंदोलनाचा दुसरा टप्पा आझाद मैदानावर आंदोलन केले होते. या आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता, मुख्यमंत्री शिंदे यांनी आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनाची सांगता करताना लेखी आश्वासन दिले होते. पण लेखी आश्वासनासोबत या विषयाच्या अनुषंगाने एक मीटिंग लावावी, अशी मागणी 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने केली होती. मंत्री शंभूराजे देसाई, महासंचालक ब्रिजेससिंह, संचालक राहुल तिडके यांनाही या अनुषंगाने निवेदन देऊन आंदोलनाची तीव्रता सांगितली होती.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लेखी मागण्या मंजूर केल्या असे सांगत दुसऱ्या दिवशीच या मागण्यांबाबत बैठक लावण्यासंदर्भातील आदेश दिले होते.

या बैठकीला 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, महासचिव दिव्या भोसले, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, मुख्य संयोजक तथा कार्याध्यक्ष योगेंद्र दोरकर, सरचिटणीस चेतन कात्रे, उपाध्यक्ष यास्मिन शेख, उपाध्यक्ष राजेंद्र थोरात यांना निमंत्रित केले होते. महामंडळाच्या अनुषंगाने तातडीने सरकारी उपाययोजना आखाव्यात, महामंडळ कार्यान्वित करावे, अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी संबंधितांना दिल्या आहेत. मुख्यमंत्र्यांचे माध्यम सल्लागार, ज्येष्ठ पत्रकार विनायक पात्रुडकर यांनी या संदर्भामध्ये पुढाकार घेऊन महामंडळ, इतर मागण्यांसंदर्भात मधला विषय शासकीय आणि कायदेशीररित्या पार पाडावा, अशा सूचना बैठकीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या मागणीनंतर महामंडळ हा विषय मार्गी लावावा यासाठी गेल्या दोन वर्षांमध्ये अनेक आमदारांनी पुढाकार घेतला. मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार, मंत्री शंभूराजे देसाई, यांच्याकडे यासंदर्भात चार वेळा बैठकाही झाल्या होत्या. शेवटी दोन वर्ष पाठपुरावा केल्यावर 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या लढ्याला यश आले.

याच बैठकीत पत्रकार महामंडळ मंडळासोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजूर केलेले विषय खालील प्रमाणे आहेत.

पत्रकारितेमध्ये दहा वर्षे पूर्ण झालेल्या पत्रकारांना अधिस्वीकृती देण्यात यावी. बार कौन्सिल प्रमाणे राज्याच्या माहिती महासंचालनालयाने शासनाचे पोर्टल तयार करून, त्या पोर्टलवर नव्याने पत्रकारितेत पदवी पूर्ण करून किमान तीन महिने पत्रकारितेचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे, अशांना पत्रकार म्हणून प्रमाणपत्र देण्यात यावे. राज्यातील अनेक वर्तमानपत्र, साप्ताहिक यांना जाहिराती देताना सर्वांना जाहिराती मिळतील याचे नवीन निकष तातडीने तयार करावेत. तसा शासन निर्णय काढावा. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर छोटे दैनिक, आणि साप्ताहिक यांना सरसकट जाहिराती देण्यात याव्यात. माहिती महासंचालनालय यांच्या वतीने पत्रकारितेला प्रोत्साहित करणारे पुरस्कार गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहेत, ते देण्यात यावे. विधानसभा निवडणुका दृष्टिपथात असल्याने राज्यातील वृत्तपत्रांच्या पडताळणीस निवडणूक होईपर्यंत स्थगिती देण्यात यावी. सेवानिवृत्ती योजनेची वाढवलेली रक्कम येत्या महिन्यापासून देण्यात यावी. या मागण्यांचा मंजुरीमध्ये समावेश आहे.

हे यश राज्यामध्ये 'व्हॉईस ऑफ मीडिया'चा झेंडा खांद्यावर घेऊन सदैव आंदोलनासाठी, कार्यासाठी तत्पर असलेल्या प्रत्येकाचे आहे, असे म्हणत 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे आणि प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# नेपाळमध्ये झालेल्या भूस्खलनात दोन बसेस वाहून गेल्या!

काठमांडू, दि. १३ (वृत्तसंस्था) - नेपाळच्या चितवन परिसरात झालेल्या भूस्खलनाच्या दुर्घटनेमुळे दोन बस त्रिशूली नदीत वाहून गेल्या. या बसमध्ये असलेले ६५ जण बेपत्ता झाले आहेत. यात ७ भारतीयांचाही समावेश आहे. काठमांडूहून निघालेली एंजल बस आणि गौरकडे जाणारी गणपती डिलक्स बसचा आज पहाटे ३.३० च्या सुमारास अपघात झाला. नारायणघाट-मुगलिंग रस्त्यालगत सिमलताल परिसरात दरड कोसळल्याने प्रवाशांसह दोन्ही बस नदीत वाहून गेल्या.

मिळालेल्या माहितीनुसार, बेपत्ता प्रवाशांमध्ये सात भारतीय नागरिकांचा समावेश आहे. एंजेल बसमध्ये २४ तर गणपती डिलक्समध्ये ४१ जण होते. गौरकडे जाणाऱ्या बसमधील तीन प्रवासी वाहनातून उडी मारून पळून जाण्यात यशस्वी झाले, असे पोलिसांनी सांगितले. चितवनचे मुख्य जिल्हा अधिकारी इंद्रदेव यादव यांनी सांगितले की, 'बचावकार्य सुरू असून, भूस्खलनाचा ढिगारा हटवला जात आहे. बचावकार्यासाठी पोलीस आणि सशस्त्र दलही सहभागी झाले आहेत.'

**नेपाळचे पंतप्रधान काय म्हणाले?**

नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल उर्फ 'प्रचंड' म्हणाले की, 'नारायणगड-मुग्लिन मार्गावर भूस्खलनात बस वाहून गेल्याच्या दु:खद घटनेने मला खूप वाईट वाटले. मी स्थानिक प्रशासनासह सरकारच्या सर्व एजन्सींना प्रवाशांचा शोध आणि प्रभावीपणे सुटका करण्याचे निर्देश दिले आहे' असे प्रचंड यांनी X वर पोस्ट शेअर करून सांगितले. देशाच्या विविध भागात पूर आणि भूस्खलनामुळे झालेल्या जीवित आणि मालमत्तेच्या हानीबद्दल पंतप्रधानांनी शोक व्यक्त केला. नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# आनंदलहरी भाग-८९

**नविये आवडीचेनि भरें । कामुक निज वनिता विसरे ।**
**मग पाडेवीण अनुसरे । भ्रमला जैसा ॥**

युध्दभूमीत आपल्या शत्रुंशी लढण्यास आलेल्या अर्जुनाने जेव्हा आपल्यासमोरील सर्व शत्रुंना न्याहाळले, तेव्हा त्याच्या लक्षात आले की, हे तर आपले सर्व बंधु, गुरु, सगेसोयरे आहेत. शत्रुंच्या ठिकाणी आप्तेष्ट पाहिल्याने त्याची मूळ वीरवृत्ती जणू लोपच पावली. अन्यायाविरुध्द लढण्याचा त्याचा जो मूळ स्वभाव आहे तो विसरुन गेला आणि शत्रुंच्या प्रेमात पडला. मोहग्रस्त झालेल्या अर्जुनाचे ज्ञानेश्वर माऊलींनी अत्यंत सुंदर प्रकारे वर्णन केले आहे. माऊलींनी स्पष्टीकरणात्मक अनेक दृंष्टात दिले आहेत. मानवी जीवनाला नेहमी लागू पडणारा दृष्टांत दिला आहे. माऊली तर ब्रम्हचारी होते, तरी पण संसारातील अनुभवी व्यक्ती प्रमाणे त्यांनी अनेक दृष्टांत दिले आहेत, याचे आश्चर्य वाटते. शत्रूंच्या प्रेमात पडून आपल्या मुळ वृत्तीला अर्जुन विसरला. नवयौवनाचा बहर असलेल्या नव्या स्त्रीच्या प्रेमात पडलेला लंपट पुरुष स्वत:च्या सौदंर्यवाण, गुणसंपन्न पत्नीला विसरतो आणि परस्त्रीच्या प्रेमात वेडा होऊन वागतो. माऊलींचा हा दृष्टांत मानवी जीवनाला बरेंच काही देऊन जातो. दुस-या स्त्रीच्या प्रेमात पडल्याने अनेकांचे संसार उध्दवस्त झाल्याचे आपण पहातो. अशा लंपटपणामुळे स्वत:चाही व समोरच्याचाही संसार उध्दवस्त होतो. आपल्या पत्नीची निवड पुरुष स्वत: करतो नि मग लग्नानंतर त्याला दुसरी स्त्री आवडू लागते, यांत पत्नीचा काय दोष ! हे सत्य असले तरीही समाजात अशी अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. माणूस स्वार्थ, मोह, काम आदी पोटी आंधळा होतो व आपला आणि समोरच्याचा संसार अंधारात लोटतो.



स्वत:ची पत्नी सोडुन माणूस जेव्हा एखादया परस्त्रीच्या प्रेमात पडतो तेव्हा ती स्त्री सांगेल ते ऐैकण्याची त्याची मानसिकता असते. तिच्या सांगेल त्या ऐकण्याने तो भ्रमिष्ट होतो. पत्नीला वाटेल तसे छळतो. पत्नीत दोष पाहायला सुरुवात करतो. समोरच्या स्त्रीमध्ये फक्त गुण पाहू लागतो. त्यामुळे संसारात पती-पत्नीच्या प्रेमात मोठी दरी निर्माण होते आणि त्याचा परिणाम सुखी संसार उध्दवस्त होण्यावर होतो. पुरुषाच्या या स्वभावाचा परिणाम त्याच्या मुलाबाळावर तर होतोच पण कळत नकळत त्याचा विपरित परिणाम समाजावरही होतो. माऊलींनी अर्जुनाला माध्यम करुन हा दृष्टांत समाजातील स्त्रीलंपट व्यक्तींना सुधारण्यासाठी दिला आहे. माऊलींच्या या दृष्टांताचे जर काळजीपुर्वक अवलोकन केले तर समाजात घडत असलेल्या अशा अनेक वाईट घटनांना आपोआप आळा बसुन माऊलींच्या दृष्टीकोनातील सुखी संसार आपणाला पाहायला मिळू लागतील. आपण कोणत्याही परिस्थितीत असे चुकीचे पाऊल टाकणार नाही, याची खात्री ज्याने त्याने केली पाहिजे. आपल्यामुळे एखादया स्त्रीच्या जीवनात संकट येणार नाही, आपल्यामुळे कोणालाही चुकीच्या मार्गावर जावे लागणार नाही, याची काळजी आपण घ्यायला हवी. आपल्याप्रमाणे इतरांचे जीवनही महत्त्वपूर्ण आहे, हे सदैव लक्षात असावे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची २१ रोजी पूर्व परीक्षा; ४६ केंद्रांवर १४ हजार ७८४ उमेदवारांची व्यवस्था

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा रविवार दि.२१ रोजी सकाळी १० ते १२ व दुपारी ३ ते ५ या अशा दोन सत्रात आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी छत्रपती संभाजीनगर या जिल्हा केंद्रावर ४६ केंद्रांवर एकूण १४ हजार ७८४ उमेदवारांच्या परीक्षेची सोय करण्यात आली असून १५७२ अधिकारी-कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी(सामान्य प्रशासन) प्रभोदय मुळे यांनी दिली आहे.

परीक्षा केंद्रांची यादी व कंसात परीक्षार्थींची संख्या याप्रमाणे-

१. न्यु हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, पिसादेवी रोड, भगतसिंगनगर, हर्सुल (३१२)

२. मौलाना आझाद कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स, रोजा बाग, हर्सुल रोड, (टॉम पॅट्रिक बिल्डींग पार्ट – ए ) (२८८)

३. मौलाना आझाद कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स् ॲण्ड कॉमर्स, रोजा बाग, हर्सुल रोड, (टॉम पॅट्रीक बिल्डींग पार्ट - बी) (४३२)

४. नुतन बहुउद्देशिय विद्यालय जळगाव रोड, हडको एन-११ हर्सुल (१९२)

५. एस.बी.ओ.ए. पब्लिक स्कूल, प्लॉट नं ५१, सिडको जळगाव रोड (२८८)

६. गोदावरी पब्लिक स्कूल (सेकन्डरी) विवेकानंद नगर एन-१२ हडको, (३१२)

७. बळीराम पाटी हाय स्कूल आणि ज्यूनिअर कॉलेज, सिडको एन-९ एम-२ (३१२)

८. श्रीमती वेणुताई चव्हाण कन्या प्रशाला एन-८ सिडको, (३१२)

९. धर्मवीर संभाजी प्राथमिक आणि उच्च माध्यमिक स्कूल एन-५ सिडको जवळ संत तुकाराम नाटयगृह (३१२)

१०. जिजामाता कन्या विद्यालय, एन - ५ सिडको (२४०) सिडको जवळ संत तुकाराम नाटयगृह जवळ

११. एम.जी.एम. जवाहरलाल नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय एन-६ सिडको, सेट्रंल नाका जवळ, (४८०)

१२. एम.जी.एम. पॉलिटेक्निक एन-६ सिडको, सेट्रंल नाका जवळ, (३१२)

१३. एम.जी.एम. संस्कार विद्यालय, एन-६ सिडको, सेट्रंल नाका जवळ (२४०)

१४. राजर्षी शाहू इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट पी-७५ , गरवारे पॉलिस्टर एम.आय.डी.सी. (३१२) चिकलठाणा.

१५. वसंतराव नाईक महाविद्यालय, लेमन ट्री जवळ, चिकलठाणा रोड, (३१२)

१६. शिव छत्रपती महाविद्यालय, एन-३ जालना रोड, सिडको, (४८०)

१७. सेंट.मीरा विद्यालय प्लॉट नं ११९/बी, एन-३ सिडको,(२८८)

१८.सेंट.मीरा विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज प्लॉट नं ११९/बी, एन-३ सिडको,(२८८)

१९. मराठवाडा तंत्रज्ञान व संस्था (एमआयटी) हायस्कूल आणि माहिती तंत्रज्ञान कॉलेज एन-४ सिडको (२८८)

२०. डॉ.रफिक झकेरिया कॉलेज फॉर वुमन नवखंडा ज्युबली पार्क (४३२)

२१. हॉली क्रास मराठी हायस्कूल, लक्ष्मी कॉलनी, कॅन्टमेंट बोर्ड (२८८)

२२. पी.ई.एस. कॉलेज ऑफ अभियांत्रिकी, पानचक्की रोड, नागसेनवन (४०८)

२३. पी.ई.एस. पॉलिटेक्निक पानचक्की रोड, नागसेनवन (२८८)

२४. मिलिंद मल्टीपर्पज हायस्कूल नागसेनवन (२८८)

२५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स नागसेनवन (२८८)

२६. विवेकानंद आर्टस आणि सरदार दिलीपसिंग कॉमर्स कॉलेज समर्थ नगर (२८८)

२७. विवेकानंद कॉलेज ऑफ सायन्स समर्थ नगर (२८८)

२८. एस.बी.इ.एस. कॉलेज ऑफ सायन्स औरंगपुरा (२८८)

२९. एस.बी.इ.एस. कॉलेज ऑफ आर्टस आणि कॉमर्स पार्ट - ए औरंगपुरा (४३२)

३०. एस.बी.इ.एस. कॉलेज ऑफ आर्टस आणि कॉमर्स पार्ट - बी औरंगपुरा (४३२)

३१. सरस्वती भुवन मुलाची शाळा, औरंगपुरा (४३२)

३२. महिला मंडळ संचलित शिशु विहार हायस्कूल, बलवंत वाचनालयाच्या बाजूला औरंगपुरा (२८८)

३३. ए.के. वाघमारे प्रशाला सरस्वती नगर, औरंगपुरा (२८८)

३४. डॉ.सौ. इंद्राबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय, आर्टस, समर्थ नगर (२८८)

३५. वसंतदादा पाटील हायस्कूल, धुत हॉस्पीटल जवळ, रामनगर, एन-२ सिडको, जालना रोड (२८८)

३६. शिवाजी हायस्कूल खोकडपूरा, शिवाजी नगर (२४०)

३७. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रेल्वे स्टेशन रोड, उस्मानपुरा (२८८)

३८. शासकीय पॉलिटेक्निक, उस्मानपुरा (३१२)

३९. देवगिरी महाविद्यालय, (ज्युनिअर कॉलेज बिल्डींग, तिसरा माळा) स्टेशन रोड, उस्मानपुरा पार्ट (बी) (४८०)

४०. देवगिरी महाविद्यालय, (ज्युनिअर कॉलेज बिल्डींग, तिसरा माळा) स्टेशन रोड, उस्मानपुरा पार्ट (सी) (२४०)

४१. नागसेन विद्यालय फुले नगर पिर बाजार, उस्मानपुरा (३१२)

४२. जी.एस.मंडल महाराष्ट्र इन्सिट्युट ऑफ टेक्नोलॉजी (बी.टेक) गेट नं.५ सातारा गाव, बीड बायपास रोड (४५६)

४३. मिलिंद कॉलेज ऑफ सायन्स, नागसेन वन (३८४)

४४. मिलिंद कॉलेज ऑफ आर्टस, नागसेन वन (२८८)

४५. जय भवानी हायस्कूल, आर्टस ॲण्ड सायन्सस कॉलेज जय विश्व भारती कॉलनी गारखेडा परिसर (२४०)

४८. शासयकीय महाविद्यालय, आर्टस आणि विज्ञान, सुभेदारी गेस्ट हाऊस जवळ विश्वास नगर (२४०)

**परीक्षार्थींसाठी सुचना:-**

१. परीक्षेस येतांना उमेदवारांने ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकाराचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.

२. परीक्षेच्या वेळी कक्षात प्रवेशप्रमाणपत्र काळ्या व निळ्या शाईचे बॉल पॉईंट पेन, ओळखपत्र व ओळखपत्राची छायांकीत प्रत या व्यतिरिक्त अन्य कोणतेही साहित्य अथवा वस्तू घेऊन जाण्यास उमेदवारास परवानगी असणार नाही.

३. उमेदवारास त्याच्या सोबत डिजीटल डायरी, मायक्रोफोन, मोबाईल, ब्लुटूथ, कॅमेरा किंवा तत्सम कोणतेही संदेशवहन उपकरण, कोणतेही इलेक्ट्रॉनिक साहित्य परीक्षाकक्षामध्ये घेऊन जाण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणले तर उमेदवारांना स्वत:च्या जबाबदारीवर परीक्षा केंद्राच्या आवाराच्या मुख्य दरवाजाबाहेरच ठेवावे लागेल. तसेच असे साहित्य ठेवण्याची जबाबदारी आयोगाची असणार नाही. परीक्षा केंद्राच्या आवाराच्या मुख्य दरवाजाच्या आत असे साहित्य आणल्यास उमेदवारांवर फौजदारी व प्रशासकीय कारवाईसह त्यांना आयोगाच्या आगामी परीक्षाकरीता बंदी घालण्यात येईल.

४. सुधारीत कार्यपद्धतीनुसार प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेच्या अर्धा तास पूर्वीपर्यंत (सकाळी ९.३० पर्यंतच) उमेदवारांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश देणे आवश्यक आहे.

५. परीक्षा कक्षात शेवटच्या प्रवेशासाठी निर्धारीत केलेल्या वेळेनंतर आलेल्या उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येणार नाही. याची दक्षता घेण्यात यावी. कोणत्याही कारणास्तव अशा उमेदवारास प्रवेश देण्याचे प्राधिकार आयोगाच्या परस्पर कोणत्याही व्यक्तींना प्रदान करण्यात आलेले नाहीत.

६. प्रत्यक्ष परीक्षा सुरु झाल्यांनतर परीक्षा उपकेंद्राचे प्रवेशद्वार बंद करुन घेण्यात यावे.

७. परीक्षेच्या पर्यवेक्षणाकरीता आयोगाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

८. परीक्षेच्या पर्यवेक्षणाकरीता जिल्हाधिकारी स्वत: पर्यवेक्षणावर लक्ष ठेवणार आहेत.

# नदी-नाल्यांचा पूर व रस्त्यांच्या खड्डयांपासून स्वतःला सांभाळा

**सध्याच्या** परिस्थितीत रस्त्यांचे खड्डे जीव घेणे झाले आहेत. पावसाळ्याची गंभीर परिस्थिती पहाता सर्वांनी स्वतःला सांभाळने गरजेचे आहे. यावर्षी पावसाने उग्र रूप धारण केल्याने राज्यात सर्वत्र पुरपरिस्थीती निर्माण होवून संपूर्ण महाराष्ट्र जलमग्न झाल्याचे दिसून येते. सध्या महाराष्ट्रासह संपूर्ण देशात पावसाच्या पाण्याने गंभीर परिस्थिती निर्माण केली आहे. महाराष्ट्रात अनेक नद्यांना महापूर आलेला असून संपूर्ण नद्या तुडुंब भरून धोकादायक स्थितीमध्ये आहेत.यामुळे अनेक धरण भरल्याने प्रत्येक धरणाचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात पुराने थैमान निर्माण केले आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पुरांमुळे अनेक गावांचा संपर्क तुटल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे अती पावसामुळे ग्रामीण व शहरी भागातील रस्त्यांना मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने दुर्घटनांचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढले आहे जनुकाय रोडचे खड्डे 'मौत का कुवाँ' बनल्याचे दिसून येते. त्यामुळे जीवीत हानी सुध्दा होत आहे. गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत अवकाळी पाऊस व पावसाळ्यातील पाऊस यामुळे वीज कोसळुन आतापर्यंत तब्बल १५७ लोकांचा बळी गेला ही सुद्धा गंभीर व चिंतेची बाब आहे. या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते. गेल्या तीन-चार दिवसांपासून विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात सतत मुसळधार पाऊस सुरू असल्याने ग्रामीण भागातील लहान मोठ्या नदी-नाल्यांना महापुर आलेला आहे. विदर्भातील जुनापाणी गावाच्या शेजारी असलेल्या तलावाचा बांध फुटल्याने सर्वत्र हाहाकार उडाला. अशा अनेक घटना विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात दिसून येत आहे. सध्याच्या परिस्थितीत अख्खा महाराष्ट्र पाण्याखाली आल्याचे दिसून येते. पावसामुळे दरवर्षी रोडला खड्डे पडतात यामुळे अनेक दुर्घटना होत असतात आणि यात अनेकांना आपला जीव सुध्दा गमवावा लागतो ही बाब महाराष्ट्रासह संपूर्ण देश चांगल्याप्रकारे जानतो. राज्यात तीन दिवस पुन्हा मुसळधार पाऊस येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळे राज्यातील लोकांनी सावधान रहाने गरजेचे आहे.पावसाचे विक्राळ रूप पहाता व यामुळे निर्माण होणारी पूरपरिस्थीती, रस्त्यांना पडलेले खड्डे यामुळे होणाऱ्या दुर्घटना यापासून सतर्क राहाने गरजेचे आहे. त्यामुळे जनतेने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नदी-नाल्याचा पुर, रोडचे खड्डे यापासून सावध रहावे जेनेकरून आपल्याला जिवीत हानी टाळता येईल. कारण 'जान है तो जहान है' हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे. कारण आपल्या पुर्वजांनी सांगितले आहे की आगीशी व पाण्याशी खेळू नये. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत पावसाच्या पाण्यापासून सावधान रहाने अत्यंत गरजेचे आहे. त्याचप्रमाणे नदी-नाल्याच्या पुरातून जावू नये किंवा प्रवास करू नये व स्वतःचा जीव धोक्यात टाकू नये. आपल्या कामांना वेळ झाला तरी चालेल परंतु नदी-नाल्यांच्या पुराशी मुजोरी करू नका व आपला जिव धोक्यात टाकू नका.आज अनेक क्षेत्रातील घरे पाण्याखाली आलेली आहेत. सिमेंट रोडच्या सुविधा झाल्यात, परंतु प्रशासनाचे ड्रेनेजकडे दुर्लक्ष झाल्याने शहर सुध्दा जलमग्न झाल्याचे दिसून येते. याचा त्रास सर्वसामान्यांना आज भोगावा लागतो आहे. अतिवृष्टीमुळे राज्यात आतापर्यंत १०४ लोकांचा बळी गेला तर १८९ प्राण्यांना आपला जीव गमवावा लागला. या व्यतीरीक्त जंगली प्राण्यांची सुध्दा पुरामुळे भयावह स्थिती निर्माण झाली आहे. अतिपावसामुळे राज्यातील २७५ गावांना जबर फटका बसलेला आहे व काही गावांचा संपर्क सुध्दा तुटल्याचे दिसून येते. शहरात जिकडे-तिकडे सिमेंटीकरण झाले आहे. परंतु ड्रेनेजची सुविधा बरोबर नसल्याने शहरात सुध्दा जिकडे पहाल तिकडे आपल्याला पाणीच पाणी दिसून येत आहे. सध्याच्या परिस्थितीत पावसाच्या पाण्याने विक्राळ रूप धारण केल्याने पशुपक्षी व मानवजातीसाठी काळ बनल्याचे दिसून येते.नर्मदा नदीत एसटी डुबल्याने १३ लोकांचा मृत्यू झाला व ४० आताही बेपत्ता आहे.अशा भयावह घटना ऐकून अंगावर शहारे येतात. त्यामुळे सर्वांनीच नदी-नाल्याच्या पुरांपासुन व मुख्यत्वेकरून रस्त्याच्या जीवघेण्या खड्डयांपासुंन सावधान राहुन आपले कार्य करावे व 'जान है तो जहान है' हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारावा.

**- रमेश कृष्णराव लांजेवार.**
माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर

# स्तोत्राची एकापेक्षा जास्त आवर्तने का करावीत?

**ठराविक** काळात त्या ईश देवतेचे स्तोत्र विशिष्ट संख्येत म्हणायचे पद्धत असते. उदा. गणपतीच्या १० दिवसांत द्वादशनाम गणपती स्तोत्र १२ वेळा म्हणतात किंवा लक्ष्मीपुजनाच्या दिवशी महालक्ष्म्यष्टकम् ११ वेळा म्हणतात. अशी साधना करण्याचे कारण, ह्या पवित्र दिवसांत संबंधित 'ईश'तत्व भरपूर प्रमाणात असते. स्तोत्र एकदा न म्हणता त्याची ९,११,१२,१६,२१, किंवा १०८ अशी आवर्तने केली तर हे तत्व आपल्याकडे खेचून घेता येते,आकर्षित करुन घेता येते. त्याचा लाभ आपल्याला मनोवांच्छित कामना पुर्ण करण्यासाठी होतो. मग देवाला एकदा स्तोत्र म्हणुन कळणार नाही का? सारखं, सारखं का म्हणायचं? हे प्रश्न बहुतेकांच्या मनात येत असतील. यात जिज्ञासा कमी, कंटाळाच जास्त आहे. मी जेव्हा लोकांना साधना सांगताना अमुक स्तोत्र इतक्या संख्येत म्हणा, असं सांगते, तेव्हा त्यांचा पहिला प्रश्न हाच असतो, 'एकदा म्हणु का? वेळ नाही हो तेवढा!' मान्य आहे, स्तोत्र ठराविक संख्येत म्हणण्यासाठी जास्त वेळ द्यावा लागतो. तसा वेळ काढता येत असेल तरच साधना करावी, अन्यथा करु नये.

स्तोत्र म्हणताना सुरुवातीला बहुतेक वेळा 'वैखरी' वाणीने म्हणजे तोंडातल्या तोंडात पुटपुटत म्हणतात. स्तोत्राची जसजशी आवर्तने होत जातील,तसतसा जप हळूहळू पुढच्या वाणीकडे सरकु लागतो. 'वैखरी'तुन 'मध्यमा'कडे तिकडून 'परा'कडे आणि शेवटी 'पश्यन्ती' वाणीत झिरपतो. जितकी पुढची वाणी, तेवढे स्तोत्र सुक्ष्म होत जाते. हे एकदा स्तोत्र म्हणून होत नाही, तर आवर्तनानेच शक्य होते. जेवढे स्तोत्र सुक्ष्म, तेवढ्या त्याच्या लहरी अंतर्मनात तयार होवू लागतात. अंतर्मनातल्या लहरी आपला ईच्छित संकल्प पुर्ण करत असतात. यामुळेच स्तोत्र एकदा म्हणुन चालत नाही,तर ते वारंवार सलगतेने म्हणणे आवश्यक ठरते. स्तोत्राची रचना ही भाषाशास्त्राच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे.यातले स्वर/व्यंजनांचे उच्चार हे ओष्ठ्य, तालव्य अशा सगळ्या प्रकारचे असतात. ते जसे आहेत,तसेच त्यांचे उच्चार व्हायला हवेत. त्यासाठी आपले उच्चार सुस्पष्ट आणि स्वच्छ हवेत. आवर्तनाने ज्या लहरी निर्माण होतात, त्या खंडीत होवु नयेत म्हणुन साधनशुचिता पाळणे महत्त्वाचे आहे.

मद्यपान, धुम्रपान, मांसाहार न करणे. परान्न (हॉटेलचे, दुसऱ्यांच्या घरातले) न खाणे.

जास्तीत जास्त सात्विक आहार घेणे.

एकाच ठिकाणी (घराच्या देवघरात) साधना करणे. कमीत कमी बोलणे. इतरांची निंदा न करणे, समोरच्याला लागट न बोलणे. पैशाचे व्यवहार सचोटीने करणे. अश्या काही गोष्टी सांभाळाव्या लागतील.

काही जणांना साधना करायची इच्छा तर असते, पण करण्यासाठी सवड मिळत नाही. अश्यावेळी ते मध्यममार्ग निवडतात. सगळी स्तोत्रे रोज सकाळी देवपुजा झाल्यावर एकदा म्हणतात. ते ठराविक दिवशी नाही,तर कायमच हा नेम पाळतात. असे केल्याने त्यांना स्तोत्रे तर पाठ होतातच शिवाय त्याच्या अगदी सुक्ष्म लहरी अंतर्मनात कायम निर्माण होत रहातात. मानसिक समाधानही लाभते.

दर संकष्टीला २१ वेळा अथर्वशीर्ष म्हणणारी मंडळी मला माहीत आहेत. दर बुधवारी ४ वेळा 'विष्णुसहस्रनाम' म्हणणारे आहेत. श्रीमंत दगडुशेठ हलवाई सार्वजनिक गणेशोत्सवात ऋषीपंचमीच्या दिवशी अथर्वशीर्षाची सामुहिक आवर्तने होतात. विचार करा, त्या स्थानी, वातावरणात किती लहरी निर्माण होत असतील! तर मंडळी, यापुढे साधना करताना स्तोत्राची आवर्तने करण्यासाठी मी वेळ काढेनच, हा निश्चय तुम्ही केलाच असेल. आजच्या लेखाचे हेच उद्दिष्ट आहे!

**- वैद्य वर्षा लाड**

## ग्रा.पं. निवडणुक : जात वैधता प्रमाणपत्र दि.१९ पर्यंत सादर करा

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - जिल्ह्यात सन २०२०-२१, सन २०२२ व जून २०२३ या कालावधीत ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक, पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या सर्व संबंधित उमेदवारांना जात वैधता प्रमाण पत्र सादर करण्यासाठी दिलेली मुदत दि.९ रोजी संपुष्टात आली असून त्यांनी आपले वैधता प्रमाणपत्र दि.१९ पर्यंत सादर करावे, असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी कळविले आहे.

जिल्ह्यात सन २०२०-२१ सन २०२२ व जून २०२३ पर्यंत राज्य निवडणूक आयोगाचे प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम निहाय पार पडलेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक, पोट निवडणूकीत राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या उमेदवारांनी त्या त्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांच्याकडे वरील शासन अध्यादेशानुसार दिलेल्या बारा महिन्याच्या मुदत वाढीच्या कालावधीत जात वैधता समितीकडून प्राप्त झालेल्या जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत दि.१९जुलै २०२४ रोजी पावेतो न चुकता सादर करावी. संबंधितांनी जात वैधता प्रमाणपत्राची प्रत सादर न केल्यास महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १०-१ अ, कलम ३०-१ अ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी कळविले आहे.

# टोमॅटो शिवाय काही अडलंय का?

**वाढलेल्या** टोमॅटोच्या दराने मला तर आनंद झाला. कारण प्रत्येक वेळी पेशंटला बहुतेक सर्व आजारांत टोमॅटो खाऊ नका असा सांगण्याचा त्रास वाचला.

**कोणत्या अजारांत टोमॅटो खाऊ नये ?**

सर्दी खोकला, सांधेदुखी, सूज, डोकेदुखी, अम्लपित्त (acidity ),

वाढलेलं uric acid, वाढलेलं creatinine, मूत्रपिंडाचे आजार ( kidney stones , CKD etc), Allergies, त्वचाविकार.

मग खायचाच कशाला रोज रोज टोमॅटो? बिया काढून नको, सास नको, टापिंग नको.

**टोमॅटोला पर्याय आहे?**

आहेच की. १५ - २० वर्षांपूर्वी टोमॅटोचा इतका वापर नव्हता. पंजाबी पदार्थांमुळे टोमॅटोची क्रेझी हा प्रकार आला.नाहीतर कोकम, चिंच, लिंबू क्वचित् आमचूर यावर आमचे पदार्थ छान बनत होतेच की !

**या घटकांचे फायदे-**

- चिंच, यामध्ये vit C भरपूर आहे, पोट साफ ठेवते, पचन सुधारते.
- मोठ्या आतड्यांचे आरोग्य सुधारते व त्यांची हालचाल (peristalsis) नियमित करते.
- सांधेदुखी असणाऱ्यांनी चिंचेची चटणी खाऊ नये. पण स्वयंपाकातील चिंच चालते.
- कोकम, ■ वजन व cholesterol कमी करते
- हृदयाचे कार्य सुधारते, ■ पचनक्रिया सुधारते
- अम्लपित्तावर वरदान, ■ अंगावर पित्त उठणे कमी होते, ■ त्वचेची कांति सुधारते, ■ लिंबू,
- Vit C चा पुरवठा, ■ पाचक
- वजन कमी करण्यात उपयोगी
- त्वचेचे आरोग्य सुधारते, ■ आमचूर
- कफ कमी करते, ■ वारंवार होणाऱ्या मूत्रप्रवृत्तिला थांबवते
- सांध्यांना मजबूती देते.

**या चारांशिवाय ऋतुनुसार उपलब्ध कैरी व आवळयाचा वापरही आपण स्वयंपाकात आवर्जून करा.**

- कैरी, ■ पाचक, ■ यकृताचे कार्य सुधारते
- आवळा, ■ Vit C चा उत्तम पुरवठा
- पाचक, ■ अम्लपित्त नाशक
- शरीरातील नवीन पेशी (cells ) बनवण्यात मदत करतो.
- एवढा मुबलक आरोग्यपूर्ण साठा असताना टोमॅटोची गरज काय ?
- कधीतरी पावभाजी , छोले बनवाताना वापरा.पण रोज रोज नको रे बाबा !

**- वैद्या चंदाराणी बिराजदार**
MD आयुर्वेद

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो.:९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# ‘मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजना’

## जिल्ह्यात आतापर्यंत ७९ हजार २६६ महिलांची नोंदणी



छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)– महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आलेल्या ‘मुख्यमंत्रीः माझी लाडकी बहीण योजनेला जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. लाभार्थी महिलांची ऑनलाईन ॲपद्वारे नोंदणी सुरु झाली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ७९ हजार २६६ महिलांची नोंदणी झाली आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुवर्णा जाधव यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री; माझी लाडकी बहिण या योजनेची नाव नोंदणी सुरु असून ही नोंदणी प्रत्यक्ष गावातच नारी शक्ती दूत या ॲपद्वारे अंगणवाडी सेविका, मदतनीस या करीत आहेत. त्यासाठी अंगणवाडी सेविका व शहरी भागात वार्ड ऑफिसर, अंगणवाडी सेविका यांचे प्रशिक्षण ही झाले आहे. नोंदणी ही ऑफलाईनही करता येते. इंटरनेट सुरळीत नसल्यास ऑफलाईन पद्धतीने नोंदणी करुन नंतर माहिती ऑनलाईन अपलोड करता येते. जिल्ह्यात आतापर्यंत १६ हजार ७७८ ऑनलाईन तर ६२ हजार ४८८ ऑफलाईन अशा एकूण ७९ हजार २६६ महिलांची नोंदणी पूर्ण झाल्याची माहिती श्रीमती जाधव यांनी दिली आहे.

या योजनेस महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत असून नोंदणीसाठी महिलांनी गर्दी केल्याचे पहावयास मिळत आहे. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याद्वारे हे अर्ज जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या जिल्हास्तर समितीकडे अंतिम मंजूरीसाठी येतील.

**जिल्हास्तर समितीची रचना याप्रमाणे–**

अध्यक्ष संबंधित जिल्हाधिकारी, सहअध्यक्ष संबंधित सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सदस्य सचिव संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सर्व सदस्य संबंधित पोलीस अधीक्षक, जिल्हा सहआयुक्त नगर प्रशासन, जिल्ह्यातील महानगरपालिकेचे आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी (उप आयुक्त दर्जापेक्षा कमी नसावे) संबंधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्ह्यातील नगरपरिषदांचे मुख्यधिकारी.

**वर्षाला १८ हजार रुपयांचा लाभ**

या योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वत:च्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण सक्षम बँक खात्यात दर महिन्याला १५०० रूपये दिले जाणार आहे. तसेच केंद/राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेद्वारे १५०० रुपयांपेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेद्वारे पात्र महिलेस देण्यात येणार आहेत. याचाच अर्थ पात्र लाभार्थी महिलेल एका वर्षात १८ हजार रूपये मिळणार आहेत.

**सुलभ प्रक्रिया**

या योजनेचा लाभ राज्यभरातील अधिकाधिक महिलांना घेता यावा यासाठी अनेक अटी शिथिल करत ही प्रक्रिया अधिक सुलभ केली आहे. आता २१ ते ६५ वर्ष या वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिलांना तसेच कुटुंबातील एका अविवाहित महिलेला दरमहा १५०० रुपये दिले जाणार आहेत.

**ऑनलाईन अर्ज प्रक्रियाही सोपी**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरायचा आहे. जिथे अशक्य आहे, तिथे ऑफलाईन पद्धतीने अंगणवाडी सेविका, सेतू सुविधा केंद्रामार्फत अर्ज जमा करता येईल. आणि घरच्या घरी मोबाईलवरुनही ‘नारीशक्तीदूत’ या ॲपवरूनही अर्ज भरता येईल.

**पात्रता**

२१ ते ६५ वर्ष वयोगटातील महिलांना लाभ

लाभार्थी महिला महाराष्ट्राच्या रहिवासी असणे आवश्यक.

लाभार्थी महिलेचे बँक खाते असणे आवश्यक .

लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रूपयांपेक्षा जास्त नसावे

पिवळे व केशरी रेशनकार्ड असल्यास उत्पन्न दाखला प्रमाणपत्रातून सूट देण्यात आली आहे.

विवाहित,विधवा, घटस्फोटीत,परितक्त्या, निराधार आणि कुटुंबातील एका अविवाहित महिलेला लाभ.

योजनेचा लाभ मिळण्यासाठी अधिवास प्रमाणपत्र नसल्यास १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्मदाखला यापैकी ग्राह्य धरण्यात येणार आहे.

परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील पुरुषाबरोबर विवाह केला असल्यास पतीचा जन्मदाखला, शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र किंवा अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे.

**आवश्यक कागदपत्रे**

योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज.

लाभार्थी महिलेचे आधार कार्ड.

महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र/महाराष्ट्रातील जन्मदाखला

सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंबप्रमुखाचा उत्पनाचा दाखला.

बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.

पासपोर्ट साईजचा फोटो.

रेशन कार्ड

या योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

**अर्ज कसा करावा?**

ज्या महिलेस ऑनलाईन अर्ज करता येत नसेल, त्याच्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया करण्याची सुविधा अंगणवाडी केंद्रात/बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये/ग्रामपंचायत/वॉर्ड/ सेतू सुविधा केंद्रे येथे उपलब्ध आहे. अंगणवाडी सेविका/ पर्यवेक्षिका/ मुख्यसेविका/सेतू सुविधा केंद्र/ ग्रामपंचायत/ग्रामसेवक/ वार्ड अधिकारी यांनी ऑनलाईन प्रस्तावित केल्यावर लाभार्थी महिलेचा अर्ज सक्षम अधिकारी यांच्याकडे सादर होईल. अर्ज करण्याची प्रक्रिया विनामूल्य आहे. अर्जदार महिलेने अर्ज करताना स्वत: उपस्थित राहणे आवश्यक आहे जेणेकरून तिचा थेट फोटो काढता येईल व बँक खात्याशी संबंधित ई–केवायसी करता येईल.

## ‘चला जाणून घेऊ या मतदान केंद्राला’ उपक्रमांतर्गत जिल्हाधिकाऱ्यांनी साधला सावंगी येथील मतदारांशी संवाद




छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)– ‘चला जाणून घेऊ या मतदान केंद्राला’ हा उपक्रम शनिवार दि.१३ व रविवार दि.१४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. यात मतदारांना मतदान केंद्राची माहिती देणे तसेच त्यासंदर्भातील अडीअडचणी जाणून घेण्यात येत आहेत. याअंतर्गत आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सावंगी येथील मतदारांशी संवाद साधला.

‘चला जाणून घेऊ या मतदान केंद्राला’ या उपक्रमाअंतर्गत आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी १०६ फुलंब्री मतदार संघात सावंगी येथील मतदान केंद्र क्रमांक १५२,१५३, १५४ येथे भेट दिली. मतदारांशी संवाद साधला तसेच मतदान केंद्र पाहणी करुन त्याबद्दल ची माहिती दिली. तसेच सारा परिवर्तन गृहनिर्माण सोसायटी मध्ये नव्याने होणाऱ्या मतदान केंद्राच्या जागेचीही पाहणी केली.

सरपंच श्रीमती आश्विनी जगदाळे, जिल्हा पुरवठा अधिकारी तथा १०६ फुलंब्रीचे निवडणूक निर्णय अधिकारी प्रविण फुलारी, पैठण उपविभागीय अधिकारी तथा ११० पैठणच्या निवडणूक निर्णय अधिकारी निलम बाफना, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार कृष्णा कानुगळे, उपसरपंच अफजल शहा, तसेच परिसरातील मतदार, सह.गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी, सभासद आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की,‘चला जाणून घेऊ या मतदान केंद्राला’ हा उपक्रम दि.१३ व १४ जुलै रोजी जिल्हाभरात राबविला जात आहे. शहरी भागात अप्पर आयुक्त मनपा, मुख्याधिकारी नपा आणि ग्रामिण भागात तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी हे आयोजन करावयाचे आहे. बीएलओ, तलाठी, ग्रामसेवक यांच्यामार्फत उपस्थित सर्व मतदारांना मतदान केंद्राविषयी माहिती देण्यात येईल. नकाशा व सादरीकरण केले जाईल. त्यानंतर मतदारांनी केलेल्या सुचनांमधून माहिती घेऊन मतदान केंद्रात बदल करण्याबाबतची माहिती तयार करुन नंतर प्रत्यक्ष पाहणी, पर्यायी व्यवस्था यांचा अहवाल तयार केला जाईल.

सावंगी येथेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी प्रत्यक्ष भेटून मतदारांना माहिती दिली व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये इसिसचे जाळे; एनआयएचे आरोपपत्र

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)– धार्मिक कट्टरतेच्या नावाखाली दहशतवाद पसरवणाऱ्या इसिस संघटनेचे जाळे छत्रपती संभाजीनगरातही पसरले असल्याचे स्पष्ट झाले आहे. किमान ५० तरुण इसिसच्या संपर्कात आहेत. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी शहरातील हर्सूल परिसरातील बेरीबाग परिसरातून एनआयएने मोहंमद जोएब खानला (३५) अटक केली होती. त्याच्याविरुद्ध शुक्रवारी मुंबईतील एनआयएच्या न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. त्यात संभाजीनगरातून सुरू असलेल्या इसिसच्या कारवायांची ही धक्कादायक माहिती समोर आली आहे.

लिबियातून जगभरात इसिसचे जाळे पसरवणारा मोहंमद शोएब खानने आयटी इंजिनिअर असलेल्या जोएबची भरती केली होती. जोएब त्याच्यासाठी स्लिपरसेल म्हणून काम करत होता. देशातील संवेदनशील ठिकाणांवर हल्ला करण्यासाठी जोएबच्या मदतीने शोएबने माथेफिरू तरुणांची टोळी तयार केली होती. भारतात मोठ्या घातपाती कारवाया करून अफगाणिस्तान किंवा तुर्कियेत पळून जाण्याचा कट रचण्यात आला होता. लिबियाचा शोएब आणि छत्रपती संभाजीनगरातील जोएब त्या कटाचे मुख्य सूत्रधार होते, असे या दोषारोपपत्रात म्हटले आहे. जोएब हा सामान्य कुटुंबातील आहे. फेब्रुवारी महिन्यात एनआयएने जोएबला अटक करत शहरात नऊ ठिकाणी छापे मारले होते. तो विवाहित असून त्याला दोन मुली आहेत. त्याचे वडील निवृत्त सरकारी कर्मचारी आहेत. जोएब बंगळुरूमध्ये नोकरी करतो. अलीकडे वर्क फ्रॉम होम असल्याचे सांगत घरून काम करत होता. त्याचे दोन भाऊ आखाती देशात नोकरी करतात. त्यातील एक आयटी इंजिनिअर असून तो इसिसचे मोठे नेटवर्क असलेल्या लिबियातील एका कंपनीत काम करतो.

## झाडाच्या कत्तल प्रकरणी एका विरुद्ध गुन्हा, वैजापूर नगर पालिकेची कार्यवाही

वैजापूर दि.१३ (प्रतिनिधी)– वैजापूर नगर पालिका हद्दीत गंगापूर रस्त्यावर क्रांती जिमच्या समोर असलेली चिंच व कवठाचे दोन झाडे नगर पालिका किवा वर्क्ष प्राधिकरणाची पूर्व परवानगी न घेता तोडण्यात आली.हि घटना शुक्रवारी दुपारी साडे तीन वाजेला उघडकीस आली.या प्रकारची गंभीर दखल घेत नगर पालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी भागवत बिघोत यांनी तातडीने पालिकेच्या पथकासह घटना स्थळी भेट देऊन बेकायदेशीर प्रकाराचा पंचनामा केला.या प्रकरणी पालिकेचे स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे यांनी पोलिसात फिर्याद दिली.त्या वरून पंकज सदाशिव बनकर (राहणार वेजापूर ) यांच्या विरूधात महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे ) झाडाचे संरक्षण व जतन अधिनियमाखाली पोलिसात गुन्हा नोद्वाण्यात आला आहे. या घटनेची अधिक माहिती अशी कि वैजापूर गंगापूर रस्त्यावर क्रांती जिम समोर असलेली चिंच व कवठाचे दोन झाडे नगर पालिका किवा वर्क्ष प्राधिकरणाची पूर्व परवानगी न घेता तोडण्यात आली.हि घटना शुक्रवारी दुपारी साडे तीन वाजेला उघडकीस आली.या प्रकारची गंभीर दखल घेत नगर पालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी भागवत बिघोत यांनी तातडीने पालिकेच्या पथकासह घटना स्थळी भेट देऊन उपमुख्याधिकारी साठे , पालिकेचे स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे व इतर स्टाफला सोबत घेऊन घटना स्थळी भेट दिली.या वेळी ज्ञानेश्वर पवार व एकनाथ हादरे वैजापूर हे दोघे इलेक्ट्रिक क्रांती च्या सहाय्याने झाडाची कत्तल करताना आढळून आले.त्याना विचारणा केली असता त्यांनी आम्ही मजूर असून आम्हाला पंकज बनकर यान हि झाडे तोडण्यास सांगितले असल्याचे पथकाला सांगितले वृक्ष तोडीसाठी कुठलीही पूर्वपरवानगी घेतली नसल्याने बनकर यांना पथकाला सांगितले .दरम्यान याप्रकरणी स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे यांच्या तक्रारी वरून पंकज बनकर यांच्या विरुद्ध वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हेड कॉस्टेबल रामचंद्र जाधव हे करीत आहेत.

## शशिकांत बक्षी यांची निवड

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)– पोलिस हक्क संघर्ष संघटना महाराष्ट्र राज्यच्या छत्रपती संभाजीनगर (पश्चिम) विधान सभा मतदार संघच्या अध्यक्षपदी शशिकांत बक्षी यांची निवड करण्यात आली आहे. शशिकांत बक्षी हे पोलिसमित्र आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेवून संस्थापक अध्यक्ष ॲड. जेबा शेख यांच्या आदेशाने राष्ट्रीय उप अध्यक्ष राजेंद्र लहाने, कार्यकारी राज्य अध्यक्ष गोपाल कच्छवे, राज्य सचिव नजिमोद्दीन काजी यांनी ही निवड केली आहे.

(पान १ वरून)

### २० तारखेला पुन्हा उपोषण,...

केला. तसेचस, विधानपरिषद निवडणुकांच्या निकालावर भाष्य करत, काल जे २०–२५ आमदार निवडून आले ते मराठ्यांच्या मतावर निवडून आले आहेत, आलेले सर्वचच्या सर्व बावळे आहेत, असे जरांगे यांनी म्हटले. तसेच, विधानपरिषदेच्या आमदारांना कोणत्या मराठ्याच्या नेत्यांनी मतदान केले, माझ्याकडे यादी येणार आहे, असेही ते म्हणाले. ओबीसी आमदारांना मतदान करणाऱ्या मराठा आमदारांना जाब विचारा, असेही ते म्हणाले.

सरकारने मला उघड पडायचा प्रयत्न केलाय. याला एक तर बदनाम करा नाहीतर घातपात करा. सरकार मला काय घात पात करेल. मला जो मारायला येणार आहे, त्याने फक्त मी जागं असल्यावर यावं, एका बुक्कीत दात पाडेन. मंडल कमिशन बरखास्त होऊ शकत, पण मला ओबीसींच वाटोळं करायचं नाही, असेही जरांगे यांनी संभाजीनगरमधील भाषणातून म्हटले.

जरांगे पाटील म्हणाले की, आम्हाला राजकारण करण्याची इच्छा नाही, मैदान सोडून मी मागे जाणार नाही, कोणाशीही संगनमत करून तह करायचा नाही, दगाफटका करायचा नाही, क्षेत्रीय लढाई समोरासमोर लढायची, विजयाचा टीका लावून यायचा नाही तर मरण घेऊनच यायचा हे आमचे रक्त आहे, असेही जरांगे पाटील म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांनी पहिल्या टप्प्यातील मराठा शांतता रॅलीची क्रांती चौकात सांगता केली. यावेळी त्यांनी पुन्हा सरकारला इशारा दिला. मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण पाहिजे, ते घेतल्याशिवाय आम्ही सोडणार नाही, जर रात्रीतून सरकारने निर्णय घेतला नाही तर तुमचा एकही आमदार देखील निवडून येऊ देणार नाही, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

मनोज जरांगे म्हणाले की, मराठ्यांची शक्ती वाया घालायची नाही, मला वाईट पाऊले उचलायचे नाही, मी आडमूठा नाही, मला समाजाला डाग लागू द्यायचा नाही, मला सर्व समाजाचा विचार करावा लागला पाहिजे, आतापर्यंत ५७ लाख नोंदी मिळाल्या आहेत, त्यातून दीड कोटी मराठा समाजाला आरक्षण मिळवून दिले. त्यामुळे मला डाव टाकण्याची संधी द्या, म्हणजे सरकारला देखील धारेवर धरता येईल.

मनोज जरांगे म्हणाले की, सरकारने आज दोन ते तीन नवीन डाव टाकले आहेत, ते मी २० जुलै रोजी समाजाला सांगेल. या सरकारला मराठा समाजाच्या वेदना समजणार नाही, मग महायुती काय महाविकास आघाडीचा एकही आमदार निवडून येणार नाही, एवढा शब्द या समाजाच्या उपस्थित देतो.

### सात राज्यातील १३ विधानसभा...

हमीरपूर आणि नालागड यांचा समावेश आहे.

१३ जागांवर झालेल्या पोटनिवडणुकीत उत्तराखंडमध्ये भाजपचे सरकार असलेल्या दोन्ही जागांवर भाजप उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. दुसरीकडे, भारतीय आघाडीचे काँग्रेस उमेदवार आणि मुख्यमंत्री सुखू यांच्या पत्नी कमलेश ठाकूर यांनी हिमाचलच्या देहरा मतदारसंघातून विजय मिळवला. याशिवाय भारत आघाडीचा भाग असलेल्या टीएमसीने पश्चिम बंगालमधील चारही जागा जिंकल्या असून भाजपला पराभवाला सामोरे जावे लागले आहे. दरम्यान, पंजाबमधील जालंधर मतदारसंघातून आम आदमी पक्षाचे उमेदवार मोहिंदर भगत विजयी झाले आहेत.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीपासून सुरू झालेला हा ट्रेंड पुढे सरकत असल्याचा दावा काँग्रेस नेते पवन खेडा यांनी केला. अशा परिस्थितीत भाजप आगामी सर्व निवडणुका हरत राहील. एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना काँग्रेस नेते पवन खेडा म्हणाले की, तेव्हापासून आम्ही अनेक निवडणुका हरलो आहोत आणि आता भाजपही याच टप्प्यातून जाणार आहे. प्रत्यक्षात या आठवड्यात झालेल्या १३ विधानसभा पोटनिवडणुकांपैकी ११ जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. जिथे इंडिया आघाडीने एनडीएवर मात केली.

### मुंबईला जागतिक आर्थिक...

बनवण्याचे आमचे स्वप्न आहे. महाराष्ट्र टुरिझममध्ये दुनियातील नंबर एक राज्य बनले पाहिजे, येथे सह्याद्रीच्या डोंगरकड्यावर रोमांच आहे. येथे छत्रपती शिवरायांचा इतिहास आहे, असेही ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग दोनशे किमी पूर्ण झाले आहे. तर संत तुकाराम महाराजांची पालखी महामार्ग देखील लवकरच पूर्ण होऊन भाविकांसाठी लाभदायी होणार आहे. दळणवळणच्या माध्यमातून राज्याची प्रगती होते, महिलांना चांगल्या सुविधा मिळतात. एनडीए सरकार हे युवा, गरीब, शेतकरी, महिलांच्या विकासासाठी काम करत आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकार देखील चांगले काम करत आहे. कौशल्य विकासच्या माध्यमातून ९ लाख कोटी युवकांना फायदा झाला आहे.

मोदी म्हणाले की, कौशल्य विकास आणि रोजगार हे महत्त्वाचे आहे. आरबीआयने एक रिपोर्ट जाहीर केला त्यात गेल्या तीन वर्षात ८ कोटी रोजगार उपलब्ध झाले. यामुळे खोटे नरेटिव्ह करणाऱ्यांना चांगली चपराक बसली आहे. यांची प्रत्येक रणनीती ही देशाच्या समोर पुढे येत आहे, यांची पोलखोल होऊ लागली आहे. रेल्वे, रेल्वे ट्रक, पुल बनतो त्यातून कोणाला कोणाला तरी रोजगार मिळतोच. पायाभूत सुविधांचा विकास होत असेल तर त्यातून लोकांना देखील रोजगार मिळतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे बोलताना म्हणाले की, सद्भाव व समृद्धी हाच विकासाचा मार्ग आहे. देशभरात ९० लाख युवकांना स्वनिधी योजनेचा लाभ मिळाला आहे. तर त्यात महाराष्ट्रातील १३ लाख युवकांना त्याचा फायदा झाला आहे. देशात रेल्वेचा जो कायाकल्प होत आहे. त्यात महाराष्ट्रातील रेल्वेला देखील मोठा फायदा झाला आहे. यात २४ कोच असलेली ट्रेन देखील या ठिकाणी धावणार आहे. नॅशनल हायवेची लांबी ही गेल्या तीन वर्षात तिन पट वाढल्याचे देखील मोदी यांनी सांगितले.

### मुंबईला जागतिक आर्थिक केंद्र...

झालेल्या आकडेवारीत महाराष्ट्रापेक्षा इतर राज्यांना जास्त निधी दिला हे वास्तव आहे. महाराष्ट्र प्रगती करत आहे हे जरी थोड्यावेळासाठी ग्राह धरले तरी केंद्र सरकारच्या आकडेवारीवरूनच महाराष्ट्र पिछाडीवर असल्याचे दिसते. दरडोई उत्पन्नात ११ वा क्रमांक, निर्यातीच्या बाबतीत मागे, परकीय गुंतवणूक व रोजगार निर्मितीतही महाराष्ट्र इतर राज्यांच्या तुलनेत मागे आहे. महाराष्ट्रात लाखो रोजगार निर्माण होतील असे मोदींनी सांगितले असले तरी बेरोजगारांची संख्या पाहता मोदींच्या दाव्यात काहीच दम नाही हे स्पष्ट होते. पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराला स्थानिकांचा विरोध असतानाही त्याला मंजुरी देण्यात आली आहे. या बंदरामुळे केवळ अदानीचा फायदा होणार असून मच्छिमारी व्यवसाय बंद पडणार आहे. महाराष्ट्राने प्रगती करावी असे जर मोदींना वाटत असते तर महाराष्ट्रातील प्रकल्प दुसऱ्या राज्यात पळवले नसते.

मोदींनी आजच्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांसह, महापुरुष व संतांची नावे घेतली, महाराष्ट्राला थोर संत महापुरुषांची परंपरा लाभलेली आहे पण त्यांचा अपमान भाजपा नेते सातत्याने करत असतात. निवडणुका आल्या की या महापुरुषांची भाजपाला आठवण येते. लोकसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्याने आता विधानसभा निवडणुकीत पराभव होईल या भितीने महापुरुष व संतांचे नामस्मरण मोदींनी केले. अरबी समुद्रातील शिवस्मारक व इंदू मील मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम अद्याप झालेले नाही याचा विसर मोदींना पडला असावा वाटते, असेही नाना पटोले म्हणाले.

### वास्तववादी अर्थसंकल्प...

असलेल्या ‘कॅग’ च्या अहवालात मांडली गेली आहे. या भाषणात मी असेही नमूद केले होते की राज्य सरकार बेदरकार पद्धतीने उधळपट्टी करत असून हा अर्थसंकल्प वास्तवापासून दूर आहे, अगदी तेच निरीक्षण महालेखापरीक्षकांनी नोंदवले असून ‘अर्थसंकल्प वास्तववादी असावा’ अशी सूचना केली आहे.

आम्ही सर्व लोक वारंवार हे सरकार अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जनतेला फसवत असल्याचे गेले काही दिवस सांगत आहोत, त्यावर काल सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या कॅगच्या अहवालाने शिक्कामोर्तब केले आहे. राज्य सरकार वाटत असलेली अनावश्यक अनुदाने कमी करावीत, मालमत्ता निर्मितीकडे लक्ष पुरवावे, वाढीव पुरवणी मागण्या सादर करताना त्याचे समर्थन करता यावे आणि वर्षाच्या शेवटच्या महिन्यात खर्च करण्याची पध्दत थांबवावी, अशा कडक शब्दांत कॅगने शिंदे –फडणवीस– पवार सरकारला सुनावले आहे. पुढची पिढी भिकेला लागली तरी चालेल पण वाडवडिलांनी कष्टाने कमावलेले सर्व फुकुन टाकून फक्त आजच्या दिवशी कशी मौजमजा करता येईल, असाच सध्याच्या राज्यकर्त्यांचा राज्य चालवतानाचा दृष्टिकोन आहे.

### पूजा खेडकर दोषी आढळल्यास...

माहिती आहे. तसेच तत्कालीन वैद्यकीय मंडळांना हे प्रमाणपत्र दिले असल्याची माहिती देण्यात आली आहे. शासकीय रुग्णालयाचे दस्तावेज तपासले असता त्यात या नोंदी आढळल्या असल्याचं जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर संजय घोगरे यांनी सांगितले आहेत.

पूजा खेडकरचे वडील सेवानिवृत्त सनदी अधिकारी दिलीप खेडकर हे भालगाव (ता. पाथर्डी) येथील रहिवासी आहेत. परंतु, गेल्या काही वर्षापासून ते पुण्यात वास्तव्यास आहेत. त्यांची मुलगी पूजा खेडकर ही दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून आयएएस अधिकारी झाली आहे. प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी म्हणून तिची पुण्यात नियुक्ती झाली होती. खासगी वाहनावर लाल दिवा लावणे, भारत सरकार असा बोर्ड लावणे, अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात हस्तांतरीत करणे, आदी नियमबाह्य वर्तन तिने केले होते त्यानंतर तिच्यावर कारवाई करण्यात आली होती.

लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत खोट्या प्रमाणपत्राद्वारे तिने हे पद मिळवल्याचा दावा करण्यात येत आहे. दृष्टिहीन आणि मानसिक आजारी असल्याचा दावा करत पूजा खेडकर आयएएस झाली. त्यासाठी तिला सहा वेळा वैद्यकीय चाचणीसाठी बोलवले होते. परंतु सहा वेळा ती हजर राहिली नाही. त्याऐवजी बाहेरुन वैद्यकीय अहवाल दिला, त्यामुळे वाद निर्माण झाला होता.